रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक २६
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार १२ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

सरदार रघुजी भोसले यांची तलवार सरकारच्या ताब्यात/२
नागोठणे पोस्ट ऑफिसची इमारत धोकादायक/५
तळा तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेला प्रारंभ/८

## महाराष्ट्र निवडणूक आयोगाचीही राहुल गांधींना नोटीस

**मुंबई :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या अडचणीत वाढ होताना दिसत आहे. कर्नाटक निवडणूक आयोगानंतर आता महाराष्ट्र निवडणूक आयोगानेही राहुल यांना नोटीस पाठवली आहे. १० दिवसांच्या आत शपथपत्रासह आपल्या आरोपांचे पुरावे सादर करण्याचे निर्देश या नोटीसमध्ये देण्यात आले आहेत. राहुल गांधी यांनी ७ ऑगस्ट रोजी दिल्लीत झालेल्या पत्रकार परिषदेत मतदारयादीमध्ये घोळ झाल्याचा आरोप केला होता. या आरोपांबाबत निवडणूक आयोगाने त्यांना आधीच पत्र पाठवले होते, ज्याची आठवण महाराष्ट्र निवडणूक आयोगाने आता करून दिली आहे. कर्नाटक निवडणूक आयोगाप्रमाणेच महाराष्ट्र आयोगानेही नोटीस पाठवल्याने राहुल गांधी यांच्यावर आता दोन्ही राज्यांतील निवडणूक आयोगांच्या प्रश्नांची उत्तरे देण्याचे आव्हान उभे राहिले आहे.

# विद्यार्थी स्कूल व्हॅनला शासनाची मंजुरी

### सुरक्षित वाहतुकीसह बेरोजगारांना रोजगाराची संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

शालेय (स्कूल) बसचे वाढीव मासिक दर परवडत नसल्याने मुलांच्या वाहतुकीसाठी अनधिकृत रिक्षाचा पर्याय निवडणाऱ्या राज्यातील पालकांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने धाडसी पावले टाकली आहेत. शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसह रोजगाराच्या संधीसाठी परिवहन विभागाकडून स्कूल व्हॅन परवाने वाटप खुले करण्यात येत आहेत. याबाबतची अधिसूचना निर्गमित होईल, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले, विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीला प्रथम प्राधान्य आहे. सुरक्षित वाहतुकीसह बेरोजगारांना रोजगाराची संधी देण्यासाठी स्कूल व्हॅनला मंजुरी देण्यात येत आहे. नव्या स्कूल व्हॅनमधून विद्यार्थी वाहतुकीचा व्यवसाय सुरू करणाऱ्यांना राज्य शासनाकडून परवाने देण्यात येतील. राज्यात अत्याधुनिक सुरक्षा सुविधांनी युक्त स्कूल व्हॅन धावती करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे.



परिवहन विभागाने बोलावलेल्या पालक आणि बस संघटना प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत अनधिकृत वाहनांतून विद्यार्थी वाहतूक होत असल्याचा मुद्दा गाजला होता. देशात सुरक्षित विद्यार्थी वाहतुकीसाठी केंद्र सरकारने स्कूल बस नियमावलीचा (ऑटोमोटिव्ह इंडस्ट्री स्टँडर्ड्स अर्थात एआयएस-०६३) आधार घेऊन अद्ययावत मानके अर्थात स्कूल व्हॅन नियमावली (एआयएस-२०४) तयार केली आहे. चारचाकी १२+१ आसनापर्यंत विद्यार्थी वाहतूक करण्यासाठी वाहनाला स्कूल व्हॅनचा दर्जा देण्यात येणार आहे.

### अशी असतील वाहतूक वैशिष्ट्ये

*स्कूल व्हॅनमध्ये जीपीएस, सीसीटीव्ही आणि डॅशबोर्डवर स्क्रीन, अग्निशमन अलार्म प्रणाली, दरवाजा उघडा राहिल्यास अलार्म यंत्रणा, ताशी ४० वेगमर्यादेसह स्पीड गव्हर्नर, पॅनिक बटण व आपत्कालीन दरवाजे, लहान विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी पायरी, गाडीच्या छतावर शाळेचे नाव.*

## खेडमध्ये जीप दरीत कोसळून आठ महिला ठार, २९ जण जखमी

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यातील पाईट गावाजवळ पीकअप जिप १०० फूट खोल दरीत कोसळली. या भीषण अपघातात आठ महिला जागीच ठार झाल्या असून २९ जण जखमी झाले आहेत. श्री क्षेत्र कुंडेश्वराच्या येथे दर्शनाला जाताना सोमवारी (दि. ११) दुपारी सव्वा एकच्या हा भीषण अपघात झाला.

सर्व अपघातग्रस्त पापळवाडी गावचे रहिवासी आहेत. या गावातील सुमारे ४० जण श्रावणी सोमवार निमित्ताने कुंडेश्वर येथे दर्शनाला निघाले होते. पाईट गावाजवळ नागमोडी वळणावर घाट चढताना पीकअप जिप रिव्हर्स आली आणि पाच ते सहा वेळा पलटी घेत दरीत कोसळली.

अपघातानंतर स्थानिक लोक तातडीने



मदतीसाठी धावून आले. त्याचप्रमाणे पोलीस व वैद्यकीय पथक घटनास्थळी दाखल झाले. जखमींना वेगवेगळ्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यापैकी काहींची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत असून मृतांचा आकडा वाढण्याची भिती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, मृतांच्या कुटुंबियांना राज्य सरकारतर्फे चार लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येणार आहे.

## आदिवासी शालेय विद्यार्थ्यांसाठी आज मोफत बससेवेचे लोकार्पण

### प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री अशोक उईके, आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष आणि जे.एम. बक्षी यांच्या संयुक्त विद्यमाने उरण विधानसभा मतदारसंघातील चौक विभागामधील आदिवासी शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत बससेवा सुरू करण्यात येत आहे. या बससेवेचा लोकार्पण सोहळा मंगळवारी (दि. १२) सकाळी ९.३० वाजता मुंबई विधान भवन येथे आयोजित करण्यात आला आहे.

या लोकार्पण सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, राज्याचे आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी तसेच इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

मोफत बससेवा चौक विभागातील कलोते मोकाशी ठाकूरवाडी, कलोते खोंडा ठाकूरवाडी, कलोते रयती ठाकूरवाडी या मार्गावर धावणार आहे. या उपक्रमामुळे संबंधित भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासाठी होणारी लांब पायपीट थांबेल आणि त्यांना सुरक्षित, सोयीस्कर व वेळेवर शाळेत पोहचण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांकरिता महत्त्वपूर्ण असा हा उपक्रम ठरणार आहे.

## कबुतरांसंदर्भातील याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

**नवी दिल्ली :** मुंबईतील कबुतरखान्यांमध्ये कबुतरांना खायला घालणाऱ्या व्यक्तींविरुद्ध एफआयआर नोंदवण्याचे निर्देश मुंबई महापालिकेला देण्याच्या उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुद्धची याचिका सोमवारी (दि. ११) सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली.

सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत यात हस्तक्षेप करण्यास नकार दिला तसेच याचिकाकर्त्यांना पुन्हा उच्च न्यायालयात जाण्याची मुभा दिली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, न्यायालयाच्या आदेशाचे आम्ही पालन करू. आता काही लोकांचा भावना यात जुळलेल्या आहेत; तर मुंबईतील जो निर्मनुष्य भाग आहे... संजय गांधी राष्ट्रीय उद्यान असेल किंवा अन्य भागांमध्ये कुठे जर अशा प्रकारे खाद्य देण्याची व्यवस्था वन विभागाच्या नियमांमध्ये बसवून करता येत असेल, तर त्याचादेखील विचार आपल्याला करता येईल.



## कर्जतमधील ‘उबाठा’ कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कर्जत तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत चिंचवलीमधील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सुरेश सुभाष भगत आणि शशिकांत रामचंद्र बुंधाटे यांनी भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या उपस्थितीत ‘कमळ’ हाती घेतले. त्यानंतर त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेतली.

पनवेलमध्ये झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमाला भाजप कर्जत तालुका मंडळ अध्यक्ष राजेश भगत, फ्रेंड्स ऑफ बीजेपीचे



जिल्हा संयोजक नितीन कांदळगावकर, नेरळ मंडळ सरचिटणीस वैभव भगत, उपाध्यक्ष रामदास भगत, अल्पसंख्याक मोर्चा प्रतिनिधी अब्दुल हक नजे आदी उपस्थित होते.

### निवडक

#### एअर इंडियाची वॉशिंग्टन डीसीला जाणारी सर्व विमान उड्डाणे रद्द

**नवी दिल्ली :** एअर इंडियाच्या विमान अपघाताला दोन महिने होत नाही तोच कंपनीने दिल्लीहून वॉशिंग्टन डीसीला जाणारी सर्व विमान उड्डाणे रद्द केली आहेत. १ सप्टेंबरपासून जवळपास २०२६पर्यंत एअर इंडियाचे एकही विमान वॉशिंग्टन डीसीसाठी जाणार नाही. या निर्णयामागे त्यांनी ऑपरेशनल घटकांचा हवाला दिला आहे तसेच ज्या प्रवाशांनी १ सप्टेंबरनंतरची तिकिटे बुक केलीत त्यांच्याशी संपर्क साधून पर्यायी प्रवास उपलब्ध करून दिला जाणार आहे.

#### दहीहंडीचा सराव करताना दहिसरमध्ये बालगोविंदाचा मृत्यू

**मुंबई :** दहीहंडीचा सराव करताना ११ वर्षीय गोविंदाचा मृत्यू झाल्याची घटना दहिसरमध्ये घडली. महेश रमेश जाधव असे मृत मुलाचे नाव असून तो दहिसरच्या केतकीपाडा येथील रहिवासी होता. पथकासोबत थर लावत असताना उंचावरून पडल्यामुळे त्याला गंभीर दुखापत झाली. त्याला रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला.

## विरोधकांचा निवडणूक आयोगावर मोर्चा

### राहुल गांधींसह अनेक खासदार पोलिसांच्या ताब्यात



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मतदार याद्यांमध्ये घोळ झाल्याचे सांगत निवडणूक आयोगावर विविध आरोप केलेले आहेत. या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी निवडणूक आयोगाने सोमवारी (दि.११) विरोधी पक्षांच्या ३० सदस्यीय शिष्टमंडळाला बैठकीसाठी बोलावले होते, मात्र या बैठकीपूर्वी इंडिया आघाडीतील खासदारांनी निवडणूक आयोगाच्या दिशेने मोर्चा काढला. यादरम्यान अनेक खासदारांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतदार यादीतील अनियमिततेबाबत आरोप केले आहेत. यावर चर्चा करण्यासठी भारतीय निवडणूक आयोगाच्या सचिवालयाने काँग्रेस खासदार जयराम रमेश यांना पत्र लिहून दुपारी १२ वाजता चर्चेसाठी वेळ दिली होती तसेच जागेअभावी जास्तीत जास्त ३० जणांची नावे कळवावीत, अशी विनंतीही आयोगाने केली होती, पण सर्व विरोधी पक्षाचे खासदार निवडणूक आयोगाच्या कार्यालयात जाण्यावर ठाम होते.

पोलिसांनी खासदारांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, मात्र कुणीही ऐकायला तयार नव्हते. विरोधी पक्षाच्या खासदारांनी संसदेच्या मकरद्वार ते निवडणूक आयोग कार्यालयापर्यंत मोर्चा काढला. अखेर पोलिसांनी राहुल गांधी, प्रियंका गांधी, संजय राऊत आणि सागरिका घोष यांच्यासह इतर अनेक खासदारांना ताब्यात घेतले.

## टीव्ही चॅनेलचे उद्घाटन



**नवी मुंबई : आवाज इंडिया मराठी टीव्ही चॅनेलचे नवी मुंबई व रायगडात पर्दापण झाले असून माजी खासदार, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रविवारी त्याचे उद्घाटन करण्यात आले. वाशी येथे झालेल्या या कार्यक्रमास माजी राज्यमंत्री अविनाश महातेकर, आरपीआयचे उपाध्यक्ष सुरेश बारशिंग, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, काँग्रेसचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष अरविंद नाईक, सामाजिक कार्यकर्ते निशांत भगत, आरपीआयचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष महेश खरे, आवाज इंडिया चॅनेलच्या संपादक राही भिडे, ब्युरो हेड योगेश महाजन, पीआर प्रतिनिधी विलास भोसले, विनोद पार्टे, हाजी शहनवाज खान, विलास चव्हाण आदी उपस्थित होते.** (वृत्त पान ६ वर..)

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा

### भरघोस रकमेची पारितोषिके; सर्वोत्कृष्ट मंडळाला ५१ हजार रुपये बक्षीस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोरगरिबांचे आधारवड, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने २३ आणि २४ ऑगस्ट रोजी रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा पनवेलमध्ये आयोजित करण्यात आली आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने भजन परंपरेला प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा पनवेल शहरातील



मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात पुरुष खुला गट आणि महिला खुला गट अशा दोन गटात होणार असून प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख १५ ऑगस्ट आहे.

स्पर्धेतील प्रथम पारितोषिक ५१ हजार रुपये, द्वितीय २५ हजार रुपये, तृतीय १५ हजार रुपये, उत्तेजनार्थ पारितोषिक सात हजार रुपये तसेच उत्कृष्ट पखवाज वादक व उत्कृष्ट तबला वादक यांना प्रत्येकी सात हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्याकरिता व अधिक माहितीसाठी सागर राजे (९२२४३४४१३६), नारायणबुवा पाटील (७७१५८३५४२४), उमेशबुवा चौधरी (९३२४८२४२०५), चंद्रकांत मने (९७६८६५६४८४), विनोद तोडेकर (७०४५८२२५४८), जगदीश म्हात्रे (९३२६८१२१९६), पूनम ठाकूर (७२०८७७६००५), अभिषेक पटवर्धन (९०२९५८०३४३), पवन राजे (९२२१०९७३३७), अनिल कोळी (९१६७४७४५०७), मच्छिंद्र पाटील (९००४०४८६३०) किंवा डॉ. शैलेश वाजेकर (९८६७२९६८५०) यांच्याशी संपर्क साधावा तसेच रायगडातील सर्व भजनी मंडळांनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## नदीत बुडून दोन तरुणांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील ऊसर्ली खुर्द येथील धाकली नदीत पोहण्यासाठी गेलेल्या दोन तरुणांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना रविवारी सायंकाळी घडली. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

कळंबोली येथे राहणारे सुमित कदम (वय ३२) आणि अक्षय देसाई (वय २८) हे इतर दोन मित्रांसोबत ऊसर्ली खुर्द येथील नदीत पोहण्यासाठी गेले होते. या वेळी सुमित आणि अक्षय या दोघांना पाण्याचा अंदाज न आल्याने ते बुडाले. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती पनवेल शहर पोलिसांना देण्यात आल्यानंतर त्यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले.

## स्वातंत्र्य दिनाचा राज्यातील मुख्य शासकीय समारंभ मुंबईत

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा ७९वा स्वातंत्र्य दिन समारंभ येत्या शुक्रवारी (दि. १५) साजरा करण्यात येणार आहे. राज्याचा मुख्य शासकीय कार्यक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंत्रालय मुंबई येथे सकाळी ९.०५ वाजता ध्वजारोहण करून साजरा करण्यात येईल. पुणे येथे राज्यपाल यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल, तर राज्यामधील जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी नियुक्त मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात यावे, असे सामान्य प्रशासन विभागाच्या राजशिष्टाचार शाखेने परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.



### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार ध्वजारोहण

ठाणे येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, बीडमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार, नागपूरला मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अहिल्यानगरमध्ये मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, गोंदियात मंत्री छगन भुजबळ, सांगली मंत्री चंद्रकांत पाटील, नाशिक मंत्री गिरीश महाजन, पालघर मंत्री गणेश नाईक, जळगाव मंत्री गुलाबराव पाटील, अमरावती मंत्री दादाजी भुसे, यवतमाळ मंत्री संजय राठोड, रत्नागिरी मंत्री उदय सामंत, धुळे मंत्री जयकुमार रावल, जालना मंत्री पंकजा मुंडे, नांदेड मंत्री अतुल सावे, चंद्रपूर मंत्री डॉ. अशोक उईके, सातारा मंत्री शंभुराज देसाई, मुंबई उपनगर मंत्री ॲड. आशिष शेलार, वाशिम मंत्री दत्तात्रय भरणे, रायगड मंत्री आदिती तटकरे, लातूर मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, नंदुरबार मंत्री ॲड.माणिकराव कोकाटे, सोलापूर मंत्री जयकुमार गोरे, हिंगोली मंत्री नरहरी झिरवाळ, भंडारा मंत्री संजय सावकारे, छत्रपती संभाजीनगर मंत्री संजय शिरसाट, धाराशिव मंत्री प्रताप सरनाईक, बुलढाणा मंत्री मकरंद जाधव (पाटील), सिंधुदुर्ग मंत्री नितेश राणे, अकोला मंत्री आकाश फुंडकर, कोल्हापूर मंत्री प्रकाश आबिटकर, गडचिरोली मंत्री ॲड. आशिष जयस्वाल, वर्धा मंत्री डॉ. पंकज भोयर आणि परभणी येथे मंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे.

राष्ट्रध्वजारोहण कार्यक्रमासाठी पालकमंत्री निश्चिती झाली नसल्यास किंवा निश्चित झालेले पालकमंत्री काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रमस्थळी वेळेवर उपस्थित राहू न शकल्यास विभागीय मुख्यालयी विभागीय आयुक्त आणि जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिकारी हे ध्वजारोहण करतील. विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण भवन येथील ध्वजारोहण विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या हस्ते करण्यात यावे, असेही राजशिष्टाचार विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम वजा करून उर्वरित शुल्काचीच आकारणी

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा मोठा निर्णय



**पुणे : रामप्रहर वृत्त**

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने शिष्यवृत्तीचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून पूर्ण शुल्क आकारण्याबाबत राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना चाप लावला आहे. या संदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभागाने परिपत्रकाद्वारे स्पष्ट सूचना दिल्या असून, शासनाच्या योजनेच्या लाभासाठी पात्र विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणारी शिष्यवृत्ती विचारात घेऊन विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम वजा करून उर्वरित शुल्काची रक्कमच विद्यार्थ्यांकडून आकारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असलेल्या विविध अनुदानित आणि विनाअनुदानित महाविद्यालयांतील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश तंत्रशिक्षण संचालनालय, राज्य समायिक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल) यांच्याकडून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे निश्चित केले जातात. प्रवेश घेत असताना संस्था महाविद्यालये, शुल्क नियामक प्राधिकरण, शुल्क निश्चिती समितीकडून निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा जास्त शुल्काची मागणी विद्यार्थ्यांकडून करत असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त होतात.

या प्रवेश प्रक्रियेदरम्यान प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना शुल्क आकारणीबाबत अडचणी येऊ नयेत, संस्थांकडून महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतुदींचे उल्लंघन होऊ नयेत, या दृष्टीने सूचना देण्यात आल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# हरवलेले मोबाईल मालकांना परत

**पनवेल : वार्ताहर**

चोरीस गेलेल्या लाखो रुपये किमतीच्या १९ मोबाईलचा सीईआयआर पोर्टलव्दारे पनवेल तालुका पोलिसांनी यशस्वीरित्या हस्तगत करून मुळ मालकांना हस्तांतरण केले.



नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत सिईआयआर पोर्टचा प्रभावीपणे वापर करून मोबाईल चोरीचा सामाना करण्यासाठी तसेच गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी आणि मोबाईल सुरक्षा वाढवण्यासाठी विशेष अभियान राबविण्यात आला होता. त्या अनुषंगाने पनवेल तालुका पोलीस ठाणे, हद्दीतील गहाळ झालेल्या मोबाईलपैकी एकूण १९ मोबाईलचा सिईआयआर पोर्टलव्दारे पनवेल तालुका पोलीसांनी यशस्वीरित्या हस्तगत करून मुळ मालकांना हस्तांतरण करण्यात आले.

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दतील चोरीस / हरविलेले मोबाईल फोन याबाबतची तकार नोंदविण्यासाठी नागरीकांना भारत सरकारव्दारे सिईआयआर पोर्टल सुरू करण्यात आले आहे. विविध राज्यातुन आतापर्यंत एकुण ९१ मोबाईल फोनची अंदाजे २.६६.०००/- रूपये किंमतीचे मोबाईल हस्तगत करण्यात आले आहे. तसेच यापुर्वी सिईआयआर पोर्टल व्दारे ७७ मोबाईल एकुण अंदाजे ९.२४.००० /- रूपये किंमतीचे असे आजपावोतो ९६ मोबाईल अंदाजे किंमत ११.५२.००० /- रूपये किंमतीचे मोबाईल शोधुन मुळ मालकांना परत करण्यात आले आहेत.मोबाईल फोन परत मिळालेल्या नागरीकांनी पोलिसांचे विशेष आभार व्यक्त केले आहेत.

# सरदार रघुजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार सरकारच्या ताब्यात; १८ ऑगस्टला मुंबईत होणार दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

नागपूरकरच्या भोसले घराण्याचे संस्थापक आणि छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील एक महत्वाचे सरदार रघुजी भोसले यांची महाराष्ट्र सरकारने लिलावात जिंकलेली तलवार आज लंडन येथे जाऊन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी ताब्यात घेतली. सोमवारी १८ ऑंगस्टला ही तलवार मुंबईत दाखल होणार आहे.

ऐतिहासिक दस्तऐवज असलेली सदर तलवार लिलावात निघाल्याचे वृत्त मिळताच मुख्यमंत्र्यांनी केलेल्या सूचने प्रमाणे ॲड आशिष शेलार यांनी तातडीने एक मध्यस्थ उभा करुन लिलाव जिंकला. महाराष्ट्र शासनातर्फे ज्या मध्यस्थीने हा लिलाव जिंकला होता त्यांना लंडन येथे प्रत्यक्ष भेटून त्याच्या कायदेशीर बाबी पुर्ण करुन आज ॲड आशिष शेलार यांनी ही तलवार ताब्यात घेतली.



दरम्यान, सर्व कायदेशीर बाबी पुर्ण करुन ही तलवार सोमवारी दि. १८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय मुंबई विमानतळावर दाखल होईल. स्वतः सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार यांच्या उपस्थितीत बाईक रॅली काढून वाजतगाजत ही तलवार दादरच्या पु. ल. देशपांडे कला अकदमीमध्ये आणण्यात येणार आहे. तर याच दिवशी ऑगस्टला मान्यवरांच्या उपस्थितीत गड गर्जना हा कार्यक्रम होणार आहे.

आज लंडन येथे लिलावात निघालेली रघुजी भोसले यांची तलवार ही मराठा शैलीच्या 'फिरंग' पद्धतीच्या तलवारीचा उत्कृष्ट नमुना आहे. सरळ, एकधारी पाते आणि सोन्याचे नक्षीकाम केलेली मुल्हेरी घाटाची मूठ ही तलवारीची वैशिष्ट्ये आहेत. पात्याच्या पाठीवर तळाशी 'श्रीमंत रघोजी भोसले सेनासाहिबसुभा फिरंग' हा देवनागरी लेख सोन्याच्या पाण्याने लिहिलेला आहे. पात्यावरील लेख ही तलवार रघुजी भोसले यांच्यासाठी बनवली गेली होती किंवा त्यांच्या वापरातील होती याकडे निर्देश करतो. तलवारीच्या मुल्हेरी मुठीवर सोन्याच्या पाण्याने कोफ्तगरी नक्षी काढलेली आहे.

# कामोठ्यासाठी स्वतंत्र अग्निशमन केंद्राची मागणी मान्य



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभेचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेवक विकास घरत यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे, कामोठेकरांच्या सुरक्षेशी संबंधित बऱ्याच वर्षांपासून प्रलंबित असलेला स्वतंत्र अग्निशमन केंद्राचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. सेक्टर ३२, प्लॉट क्रमांक ५ ही जागा अग्निशमन दलासाठी अधिकृतपणे आरक्षित करण्यात आली आहे. हा निर्णय म्हणजे कामोठेकरांच्या सुरक्षेसाठी उचललेले एक भक्कम पाऊल असून आपत्कालीन परिस्थितीत मदत अधिक तत्पर होणार आहे. या कामाची निविदा तातडीने काढून, कामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्याची विनंतीदेखील आयुक्तांकडे करण्यात आली आहे, जेणेकरून हा उपक्रम लवकरच वास्तवात उतरेल. त्यानिमित्त पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांचा कामोठे मंडळाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला

या प्रसंगी माजी नगरसेवक विजय चिपळेकर, समाजसेवक प्रदीप भगत, रवी गोवारी यांची उपस्थिती लाभली. यावेळी महापालिका आयुक्त मंगेश चितळे आणि आमदार प्रशांत ठाकूर यांचे विकास घरत यांनी आभार मानले.

# नवीन पनवेलमध्ये गुरुकुल तायक्वांदो अॅकॅडमीच्या शाखेचे उद्घाटन

**पनवेल : वार्ताहर**

गुरुकुल तायक्वांदो अॅकॅडमीची नवीन शाखा कृष्णा-सिंधु अपार्टमेंट, भुजबळवाडी, सेक्टर १५ ए,नवीन पनवेल येथे सुरू करण्यात आली. या शाखेचे उद्घाटन नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ आणि संस्कार प्रतिष्ठानच्या संस्थापिका ॲड. सुरेखा भुजबळ यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले.




उद्घाटनावेळी गुरुकुल तायक्वांदो अॅकॅडमीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट प्रात्यक्षिके सादर केली तर ॲड. मनोज भुजबळ यांनी उपस्थितांना विशेष शुभेच्छा देत पनवेल महानगरपालिकेच्यावतीने तसेच त्यांच्या वैयक्तिक सामाजिक पाठबळातून आवश्यक ती सर्व मदत व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या वेळी नुकत्याच मलेशियामध्ये झालेल्या आशियाई तायक्वोंडो अजिंक्यपद स्पर्धेत 'सर्वोत्कृष्ट प्रशिक्षक' हा पुरस्कार मिळालेल्या तुषार तानाजी सिनलकर यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. गुरुकुल तायक्वांदो अॅकॅडमी ही या खेळातील एक प्रतिष्ठित संस्था असून आजवर चार आंतरराष्ट्रीय खेळाडू, ३० राष्ट्रीय खेळाडू, सात राष्ट्रीय पंच, १५० पेक्षा जास्त विविध स्तरावरील पदक विजेते खेळाडू घडविले असून आत्तापर्यंत ५०० हून अधिक खेळाडूंनी प्रशिक्षण घेतले आहे.

नवीन पनवेल शाखेत प्रशिक्षण दर बुधवार व शनिवार सायंकाळी दिले जाणार आहे. या शाखेत विद्यार्थ्यांना शारीरिक तंदुरुस्ती, आत्मसंरक्षण व तायक्वोंडोचा दर्जेदार अभ्यास करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. या नव्या उपक्रमामुळे मुलामुलींसाठी एक चांगली संधी निर्माण झाली आहे.

कार्यक्रमास गुरुकुल तायक्वांदो अॅकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक रोहित सिनलकर , प्रेम पाटणे तृप्ती सिनलकर, आशिष राडिये, ओमकार चव्हाण, ओमकार भोसले, प्रेम जाधव, श्रावणी पाटणे, चैताली नागने, समृधी पवार, श्रावण भोसले, आर्या माने, प्रनुशा रावत, प्राची शेळके, स्वरा घोरपडे, वैभवी जाधव, समीक्षा बोधगिरे उपस्थित होते.




# खालापुरातील चौक गावात चोरी; चोरटे सीसीटीव्हीत कैद

**खोपोली : प्रतिनिधी**

चड्डी बनियन टोळी खालापुरात सक्रिय झाली असून, तालुक्यातील चौक गावात ग्रामीण रुगणालय सरकारी निवासस्थानात बंद खोली फोडून रोख रक्कम आणि दागिने असा २७हजार ५००रुपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

चड्डी बनियनवर असलेली चोरट्यांची चौकडी तिसऱ्या डोळ्यात कैद झाली आहे. मनीषा राजेश भालगे चौक ग्रामीण रुग्णालयात कर्मचारी असून जवळच सरकारी निवासस्थानात राहतात.

रविवारी रात्रपाळीसाठी मनीषा खोलीला कुलूप लावून गेल्या होत्या. पहाटे सुमारे साडेतीन वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी कुलुप तोडून आत प्रवेश करुन लाकडी कपाटातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी केली. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई जगताप हे करीत आहेत.

# घरोघरी तिरंगा मोहिमेंतर्गत सार्वजनिक स्थळांची लोकसहभागातून स्वच्छता

**नवी मुंबई : बातमीदार**

तिरंग्याविषयीचा राष्ट्राभिमान जागृत करणाऱ्या घरोघरी तिरंगा अर्थात हर घर तिरंगा मोहीमेंतर्गत आज विविध विभागांमध्ये महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसहभागातून विशेष स्वच्छता मोहीमा राबविण्यात आल्या. स्वच्छ सर्वेक्षण २०२५ अंतर्गत आयोजित या मोहीमा अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे व स्मिता काळे आणि परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे व परिमंडळ २ उपआयुक्त संजय शिंदे व मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांच्या निरीक्षणाखाली राबविण्यात आल्या.

यामध्ये बेलापूर व नेरूळ विभागांनी संयुक्तपणे ज्वेल ऑफ नवी



मुंबई परिसरात बेलापूर विभागाचे सहा.आयुक्त डॉ अमोल पालवे व नेरूळ विभागाचे सहा. आयुक्त जयंत जावडेकर तसेच बेलापूर विभागाचे स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर व नेरूळ विभागाचे स्वच्छता अधिकारी अरूण पाटील यांच्या नियंत्रणाखाली प्रभावी रितीने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहीमेमध्ये ५२ गोणी कचरा संकलित करण्यात आला. यामध्ये एसआयईएस महाविद्यालयाचे एनएसएस युनिटचे विद्यार्थी, नागरिक तसेच स्वच्छताकर्मी सहभागी होते.

वाशी विभागातही सहा.आयुक्त सुखदेव येडवे व स्वच्छता अधिकारी जयश्री आढळ यांच्या माध्यमातून वाशी मिनी सी शोअर जुहूगाव चौपाटी परिसरात टिळक कॉलेजचे एनएसएस विद्यार्थी यांच्या सहयोगातून सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

# डी.एम. पवार यांची प्रभारी प्राचार्यपदी नियुक्ती

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथील कोकण एज्युकेशन सोसायटीचे श्रीमती गु. रा. अग्रवाल विद्यामंदिर व एस.पी. जैन ज्युनिअर कॉलेजच्या प्रभारी मुख्याध्यापक/प्राचार्यपदी रोहा येथील डी.एम.पवार यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. या वेळी त्यांचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी माजी प्राचार्या राधिका ठाकूर यांच्या हस्ते त्यांचे गुलाब पुष्प देवून स्वागत करण्यात आले. त्यावेळी सोबत स्टाफ सेक्रेटरी अनिल तिरमले, भिमराव शिंदे, शिक्षक प्रतिनिधी अबेसिंग गावित, सत्रप्रमुख रमेश जेडगे, नेताजी गायकवाड तसेच वरिष्ठ लेखनिक संतोष गोळे व इतर सेवकवृंद उपस्थित होते.

दरम्यान, देविदास मोतीराम पवार अर्थात डी.एम.पवार या नावानेच ते सगळीकडे सर्वपरिचित आहेत. ते हिंदी विषयात पारंगत असून त्यांनी रोहा येथील कोएसो मेहेंदळे हायस्कूल येथे सुमारे २० वर्ष हिंदी विषयाचे अध्यापन केले आहे. अध्यापनाची आवड, हिंदी विषयाचे उत्तम ज्ञान, विद्यार्थी प्रिय शिक्षक,सहकार्य वृती, शिस्तप्रिय शिक्षक अशी त्यांनी आपली ख्याती निर्माण केली आहे. त्यासोबतच कोएसो आंतरशालेय वॉकस्पर्धा प्रमुख, सहल प्रमुख, शिक्षक प्रतिनिधी, शिक्षक पालक समितीचे प्रमुख, इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा केंद्र संचालक,अशा विविध भूमिका त्यांनी अनेक वर्षे उत्तमरीत्या चोख पार पाडल्या आहेत.



# दिवा गावात नारळी पौर्णिमा उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

दिवा कोळीवाड्यामधील कोळी बांधवांनी नारळी पौर्णिमेनिमित्त गावातून मिरवणूक काढली होती. दिवा कोळीवाडा ग्रामस्थ, नवजीवन कलापथक दिवा कोळीवाडा यांच्या वतीने नवजीवन कलापथकाचे कार्याध्यक्ष चंदू पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नारळी पौर्णिमा उत्सव प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.




दिवा कोळीवाड्यातील श्री विठ्ठल रुक्माई मंदिरात नारळाचे पूजन करून बॅन्जोच्या तालावर पारंपारिक वेशभूषा परिधान केलेल्या युवती, युवक, महिला यांनी कोळीगीताच्या तालावर नृत्य सादर करत दिवा गावातून मिरवणूक काढण्यात आली.

या वेळी मिरवणुकीमध्ये ज्येष्ठ समाजसेवक चंदू पाटील शिवसेनेचे पदाधिकारी व उद्योजक बंडू केणी, भाजपचे पदाधिकारी राजेश मढवी, भाजपचे युवा पदाधिकारी निकेतन पाटील, मंडळाचे अध्यक्ष चंदन मढवी, उपाध्यक्ष नामदेव पाटील सचिव प्रल्हाद नाईक, सुत्रधार यशवंत दिवेकर युवा उद्योजक निलेश पाटील तसेच अन्य ग्रामस्थ मंडळी या मिरवणुकीमध्ये सहभागी झाले होते.

# केशव राणे यांची अध्यक्षपदी निवड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा सी.के.टी विद्यालयात झाली. सभेचे अध्यक्षस्थानी शिवराज राणे होते. या वेळी संघाच्या अध्यक्षपदी केशव राणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली .



सभेची सुरुवात उपाध्यक्ष संतोष चव्हाण यांनी सर्वांचे स्वागत करून केले व मंडळाचा वार्षिक आर्थिक अहवाल मंजूर झाला. सचिव रामचंद्र मोचेमाडकर यांनी मागील वर्षातील कार्यकालातील संघाच्या कार्याची माहिती दिली व संस्थेने वृक्षारोपण, महिला दिन,वर्धापन दिन, संमेलन अस्या विविध सामाजिक कार्याचे आलेख सभेपुढे मांडला. त्यानंतर सभेने केशव राणे यांची २०२५-२९ कार्यकालासाठी निर्विवाद एकमताने निवडून दिले.

केशव राणे गेली सहा वर्ष अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळत होते त्यांनी पुन्हा अध्यक्ष पदाची संधी दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. त्यांनी संघांचे विवाह मंडळ चालक वासुदेव सावंत, बाबू दळवी, किशोर सावंत तसेच भजन मंडळाचे प्रदीप रावले यांच्या कार्याचे कौतुक केले. खजिनदार दीपक तावडे, सहखजिनदार बाबाजी नेरुरकर यांचे कार्याचे देखील कौतुक केले. महिला अध्यक्ष प्रिता भोजने यांनी महिलांनी मंडळ कार्यात उस्पुर्थ सहभाग नोंदवावा ही विनंती केली. सभेला मोठया संख्येने सदस्य उपस्थित राहिले त्यांचे व सी. के.टी. व्यवस्थापन आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल आभार मानून अध्यक्ष केशव राणे यांनी सभेची सांगता केली.

## निवडक

### रेल्वेमधून महिलेची बॅग पळवली

**पनवेल :** रक्षाबंधनासाठी बहिणीकडे चाललेल्या व्यक्तीची रेल्वेतून बॅग चोरीला गेल्याची घटना घडली आहे. या बॅगेमध्ये त्यांचा लॅपटॉप व मोबाईल होता. सायन येथे राहणारे सिद्धांत सायगांवकर (वय २५) हे रेल्वेने पनवेलला जात होते. दरम्यान, त्यांनी रेल्वेत ठेवलेली बॅग चोरट्यांनी पळवली. या प्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रोडपाली येथून तरुण बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून एक २२ वर्षीय तरुण कोठेतरी



निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. बेपत्ता तरुणाचे नाव यश सोहन यादव (वय २२, रा. बी-१४०१, फिनिक्स हाईट्स, रोडपाली, से-१७, कळंबोली) असून त्याचा रंग गोरा, उंची पाच फुट आठ इंच, अंगाने मध्यम, भाषा हिंदी बोलतो, पायात चप्पल, अंगात निळा टीशर्ट, काळी जिन्सपॅन्ट आहे. तसेच तो डोक्याने मतिमंद व डोळ्याला चष्मा घालतो. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने कळंबोली पोलीस ठाणे किंवा पोहवा आर.जी. पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### लोकशाही दिनी दोन अर्ज प्राप्त

**नवी मुंबई :** कोकण विभागीय लोकशाही दिन कोंकण भवनमध्ये अपर आयुक्त रवींद्र पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी नागरिकांनी तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयांकडे पाठविण्यात आली. या वेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या चार असून आलेल्या अर्जांची संख्या दोन आहे, असे एकूण प्राप्त अर्ज सहा होते. त्यापैकी तीन अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. आता कोंकण विभागीय स्तरावर तीन अर्ज प्रलंबित आहेत.

### कोकण भवन येथे ध्वजारोहण

**नवी मुंबई :** स्वातंत्र्यदिनाच्या वर्धापन दिनोत्सवानिमित्त कोकण विभागीय स्तरावरील ध्वजारोहण सीबीडी बेलापूर, नवीमुंबई येथील कोंकण भवन इमारतीच्या प्रांगणात शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ठीक ०९.०५ वाजता कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी (भा.प्र.से) यांच्या हस्ते होणार आहे. या राष्ट्रध्वज वंदन व संचलन समारंभास शासकीय अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने राष्ट्रीय अथवा समारंभीय पोषाखात उपस्थित रहावे, समारंभ सुरू होण्याच्या २० मिनिटे अगोदर कार्यक्रमस्थळी उपस्थित रहावे. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने कृपया कोणतीही बॅग सोबत आणू नये, असे आवाहन कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

# पनवेलमध्ये क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम

## महापालिका मुख्यालयात नियोजन बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका मुख्यालयात सोमवारी (दि.११) राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम अंतर्गत टीबी मुक्त भारत अभियान यशस्वीपणे अमंलबजावणी करण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली टीबी फोरमची बैठक घेण्यात आली. या बैठकित अतिजोखीमग्रस्त क्षयरूग्णांना उपचाराखाली आणून क्षयरोग निमुर्लन करण्याच्यादृष्टीने विविध उपाय योजनांवरती या वेळी चर्चा करण्यात आली.



या वेळी टीबी फोरमचे उपाध्यक्ष प्रसेनजित कारलेकर, सचिव मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, जागतिक आरोग्य संघटनेच्या ठाणे मंडळाच्या सल्लागार डॉ. ज्योती साळवे, माजी नगरसेवक डॉ.अरूण भगत, इंडिन मेडिकल असोशिएशनचे अध्यक्ष डॉ. गिरीश गुणे, बालरोग तज्ज्ञ डॉ.जय भांडारकर, एमजीएम क्षयरोग विभागाचे विभाग प्रमुख डॉ. प्रदीप पोतदार, मधुमेह तज्ज्ञ डॉ. कीर्ती समुद्रा, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. उषा राठोड, पालिका वैद्यकिय अधिकारी उपस्थित होते.

या वेळी उपस्थितांनी जास्तीत जास्त क्षयरोग रूग्णांपर्यंत पोहचण्यासाठी खासगी रूग्णालयांनी तसेच लॅबनीदेखील क्षयरोग रूग्ण तसेच संशयित रूग्णांची महापालिकेकडे नोंदणी करण्याविषयीच्या सुचित केले. तसेच आयुक्तांनी महापालिका कार्यक्षेत्रातील रूग्णांलयांनी व पॅथलॉजी लॅबनी महापालिकेकडे क्षयरोग रूग्णांची नोंदणी करणे बंधनकारक करणेकामी महापालिकेच्या वतीने त्यांना पत्र देण्याच्या सूचना वैद्यकिय आरोग्य विभागास दिल्या. सध्या क्षयरूग्णांना आठवड्याची औषधे रूग्णांना दिली जातात, परंतू या रूग्णांना महिन्याभराची औषधे देण्याची सोय करण्याबाबत सूचना निर्गमित केल्या.

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत '१०० दिवसीय क्षयरोग मोहिम' पनवेल महानगरपालिका क्षेत्रात ७ डिसेंबर २०२४पासून राबविण्यास सुरूवात करण्यात आली आहे. ही मोहीम आता टीबीमुक्त अभियान म्हणून राबविण्यात येणार आहे.

या मोहीम अंतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील अतिजोखमीच्या भागामध्ये जसे कि झोपडपट्टी, वीटभट्टी, कामांसाठी स्थलांतरित झालेले कामगार, बेघर, इतर सामाजिक गट, तसेच तुरुंग, वृद्धाश्रम, आश्रम शाळा, वस्तीगृह, बांधकाम स्थळावरील कामगार, औद्योगिक भागात विभागनिहाय क्षयरोग शिबीराचे आयोजन पालिकेच्या वतीने घेण्यात येणार आहे.

संशयित रूग्णांनी स्वत:हून येऊन महापालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये येऊन मोफत उपचार घेऊ शकतात. या रूग्णांचा आरोग्य केंद्रामध्ये छातीचा एक्स रे व क्षयरोग चाचणी अर्थात NAAT चाचणी करण्यात येत आहे. याबरोबरच क्षय रुग्णांना निक्षय पोषण योजनेचाही लाभ देण्यात येत आहे.

### निक्षय मित्र करणार मदत

केंद्र शासनाने सुरु केलेल्या या अभियानांतर्गत, 'निक्षय मित्र' बनवून त्यांच्या मार्फत क्षयरुग्णांना सहा महिने ते ३ वर्षांपर्यंत कोरडा आहार पुरविण्यात येत आहे. 'निक्षय मित्र' हा क्षयरुग्णांना सामुदायिक सहाय्य हा आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या उपक्रमाद्वारे समाजातील विविध घटक जसे की सहकारी संस्था, कॉर्पोरेट कंपन्या, निवडून आलेले प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था व व्यक्ती – क्षयरुग्णांना सहाय्य करून मदत करू शकतात आणि 'निक्षय मित्र' बनू शकतात.

निक्षय पोषण योजने अंतर्गत क्षय रुग्णांना उपचारादरम्यान दरमहा १ हजार रूपये देण्यात येते. यासाठी महापालिकेत नोंदणी करणे आवश्यक आहे तसेच बँक खाते माहिती जवळच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील टीबी पर्यवेक्षकाकडे जमा करावी.



**पनवेल : शहरातील कापड बाजारातील जैन स्थानक येथे सोमवारी श्रमणसंघीय युवाचार्य महेंद्रऋषींच्या प्रेरणेतून नऊ तासांच्या नवकार महामंत्र जपाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर तसेच अर्चना ठाकूर, कविता पाटील, विद्या वाकडीकर यांची उपस्थिती लाभली. बसंती जैन, सुरभी जैन, संजय जैन यांच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.**



**उलवे नोड : महिला मोर्चा उलवे नोड २ अध्यक्ष योगिता सुहास भगत यांच्या अध्यक्षतेखाली उलवे पोलीस ठाणे येथे पोलीस बांधवसाठी रक्षाबंधनचा कार्यक्रम करण्यात आला. या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक रजाने व पोलीस कर्मचारी विश्वनाथ पाटील, उमाकांत गोलवड़, जगताप, सचिन केकरे, वृषाली मोकल, गावित मॅडम तसेच महिला मोर्चाच्या अध्यक्ष योगिता भगत, उपाध्यक्षा सुजाता पाटील, कामिनी कोली, उषा देशमुख, मीनाक्षी पाटील, नंदा ठाकूर, सुजाता सिंग, आशा ठाकूर, शिवानी रॉय सर्व पदाधिकारी महिला उपस्थित होत्या.**

## 'जाणीव'तर्फे पोलीस बांधवांसोबत रक्षाबंधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि मदतीसाठी सदैव २४ तास तत्पर असणारे पोलीस बांधव रक्षाबंधन या सणाच्या दिवशीसुद्धा आपल्या कर्तव्यावर होते. कर्तव्यावर असतानाही त्यांना सणाचा आनंद मिळावा आणि त्यांच्या हातावर बहिणीने राखी बांधावी, या उद्देशाने पनवेल शहर पोलीस ठाण्यामध्ये जाणीव एक सामाजिक संस्थेच्या महिला पदाधिकारी आणि सदस्यांनी रक्षाबंधन सण साजरा केला.



या वेळी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक अभंग, सहाय्यक सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील वाघ, श्री घेवडेकर, पोलीस उपनिरीक्षक कदम, पोलीस हवालदार परेश म्हात्रे यांच्यासह पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना जाणीव एक सामाजिक संस्थेच्या भगिनींनी राख्या बांधल्या.

या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेच्या माजी उपमाहापौर चारूशीला घरत, माजी नगरसेविका नीता माळी, भाजपाच्या शहर उपाध्यक्ष महिला नीता मंजुळे, वॉर्ड अध्यक्ष संजीवनी खिलारे, सदस्य ज्योस्तका माळी, तब्बसूम खान, सुवर्णा सर्जेराव, हमीदा परमार, बबिता गुप्ता, प्राजक्ता नलावडे आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## खारघरमधील शिवमंदिरात रूद्राभिषेक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या आध्यात्मिक शांती आणि सद्गुणांच्या प्रार्थनेसाठी खारघर येथील शिवमंदिरात रुद्राभिषेकचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते.



उत्तर भारतीय मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष संतोषकुमार शर्मा यांच्या सौजन्याने या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ही पवित्र पूजा केवळ माझ्यासाठी नव्हे, तर सर्वांच्या मंगलमय जीवनासाठी, उत्तम आरोग्यासाठी आणि शुभशांतीसाठी समर्पित होती, असे प्रतिपादन या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

या वेळी भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, उत्तर भारतीय मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष संतोषकुमार शर्मा, खारघरचा राजा मंडळाचे अध्यक्ष विजय पाटील, महिला मोर्चाच्या संध्या शारबिद्रे युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, अनिल खोपडे, विजय मोरे, राजेंद्र मांजरेकर, राजेश पांडे, पुष्पा तिवारी, भारती मिश्रा, अवधेश शुक्ला, अजय माळी, निलम विसपुते, अमीत ढई, स्नेहल बढई, प्रसन्ना धर्माधिकारी, रजनी शर्मा, ब्रिजेश शर्मा, प्रिती शर्मा, सीधी शर्मा, मनमोहन शुक्ला, अमीत शर्मा आदी उपस्थित होते.

## खारघरमध्ये कॅफेचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिला उद्योजकांच्या एकत्रित प्रयत्नातून खारघरमध्ये साकार झालेल्या 'कॅफे सेंट्रल -पॅन एशियन क्युझिन' कॅफेचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी झाले. या वेळी आमदार ठाकूर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आणि सर्व महिला संचालकांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. 'कॅफे सेंट्रल' हे विविध पॅन एशियन खाद्यपदार्थांचा अनुभव देण्यासाठी सुरू करण्यात आला आहे.



विभूती बेहरा, चंदा रुद्रावर, डॉली पुरोहित, इस्पिता नायक, नुतन म्हात्रे, लेखा डांगट, वर्षा बोकाडे, सुषमा गायकवाड, सुप्रिया चंदने, सुनीता पात्रो, सुनीता हेकरे, संगीता नायक, संध्या पांडे, प्रियांका गोयल, मोनाली डोके, अरुणा झा आणि सुगंधा सिन्हा या १७ महिलांनी एकत्रित येऊन हे कॅफे सुरू केले आहे. कॅफे सेंट्रलच्या उद्घाटन समारंभाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, सोयूझ तालिब, कविता परवानी-तालिब, शेफ सेबास्टियन फेर्नांडिस आदी पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

## पनवेल पोलिसांची जुगार अड्ड्यावर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या विशेष पथकाने शहरातील लक्ष्मी वसाहत येथील अविनाश शिंदे यांच्या छताला पत्रा असलेल्या घरामध्ये धाड टाकून केलेल्या विशेष कारवाईत आठ जणांना ताब्यात घेतले आहे व त्यांच्याकडून जुगारासाठी वापरलेली रोख रक्कम हस्तगत केली आहे.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांना लक्ष्मी वसाहत येथे बेकायदेशीररित्या जुगार अड्डा चालवून तेथे रोख रक्कमेचा वापर करून १३ पानी पत्ते लावून जुगार खेळत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पो.नि.सुनील वाघ, पोउपनि. हजरत पठाण, पो.ना.रवींद्र पारधी आदींच्या पथकाने सदर ठिकाणी धाड टाकून बेकायदेशीररित्या जुगार खेळणाऱ्या आठ जणांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून रोख रक्कम जुगार खेळण्यासाठी वापरलेली हस्तगत केली आहे व त्यांच्या विरोधात महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियमचे कलम ४ (अ), १२ (अ) अन्वये कारवाई केली आहे. यामुळे बेकायदेशीररित्या जुगार तसेच इतर व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.



# गव्हाण विद्यालयात इयत्ता अकरावीचा प्रवेशोत्सव

## चेअरमन अरुणशेठ भगत यांची अध्यक्षीय उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेशीत इयत्ता अकरावी या वर्गातील विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव समारंभ रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये उत्साहात झाला.

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी यांचेसह यांच्यासह विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, माजी शिक्षक शेख, ज्युनिअर कॉलेजचे विभागप्रमुख संजय उगले, ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र चौधरी यांचेसह माणिक घरत, करुणा तांडेल, सुवर्णा किर्लोस्कर, अर्चना पाटील तसेच ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे,सागर रंधवे आदी उपस्थित होते.

या वेळी चेअरमन अरुणशेठ भगत यांनी भाषणामध्ये विद्यार्थ्यांने जिद्दीने अभ्यास करून आपली गुणवत्ता वाढवावी व विद्यालयाच्या शिस्तीचे पालन करावे आणि उत्तम ज्ञान व आचरणाने या देशाचे सुजाण नागरिक बनावे, असे आवाहन केले. या वेळी पुढे बोलताना परिसरातील बदलत्या स्थित्यंतरांचे दाखले देत अरुणशेठ भगत म्हणाले की, विद्यार्थ्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या लौकिकाला साजेल असे विविध क्षेत्रांमध्ये आपले प्राविण्य संपादन करून चमकदार कामगिरीन्वये गुणवत्तेचे यशोशिखर पादाक्रांत करावे, असे सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात विद्यालयाचे ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख संजय उगले यांनी लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, अरुणशेठ भगत व सर्व समिती सदस्यांच्या व प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाची उत्तम शैक्षणिक गुणवत्ता वृद्धींगत होत असल्याचे सांगून यापुढेही ही यशाची परंपरा कायम राखण्याचा संकल्प केला.

दरम्यान, या शैक्षणिक वर्षातील इयत्ता अकरावीचा हा प्रवेशोत्सव सोहळा संस्मरणीय व्हावा यासाठी विद्यालयाच्या प्रांगणात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

## संपादकीय

# कांगावेखोर ओरड

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली विरोधकांनी निवडणूक आयोगासारख्या अत्यंत महत्त्वाच्या संस्थेच्या विश्वासार्हतेविषयी संभ्रम व संशयाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न चालवला आहे. त्यामुळेच सोमवारी निवडणूक आयोगाने ३० लोकप्रतिनिधींनी भेटायला यावे असे सांगून इंडी आघाडीला भेटीची वेळ देऊनही विरोधकांनी मात्र आयोगाविरोधात मोर्चा काढणेच पसंत केले.

**देशात २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची राजवट सुरू झाल्यापासून काँग्रेस पक्षाला सातत्याने देशभरातील निवडणुकांमध्ये पराभवाचा सामना करावा लागतो आहे. काही केल्या निवडणुकांमध्ये यश हाती लागत नसल्याने, सत्तेपासून दूर राहण्याची सवय नसलेल्या काँग्रेस पक्षाने गेली काही वर्षे सातत्याने ईव्हीएमवर आपल्या पराभवाचे खापर फोडले आहे. ईव्हीएम हॅकिंगचे दावे करणारे हे नेते निवडणूक आयोगाने हे दावे पुराव्यांनिशी सिद्ध करण्यासाठी पाचारण केले असता मात्र कधीही समोर आले नाहीत. बिनबुडाचे आरोप करायचे, संभ्रम निर्माण करायचा व न्यायालयात माफी मागून स्वत:ची सुटका करून घ्यायची ही कार्यपद्धती काँग्रेस नेते व विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अनुसरल्याचे अनेकदा दिसले आहे. मागील लोकसभा निवडणुकीचे वेळी ते हातात संविधानाची प्रत नाचवत सत्ताधारी संविधान बदलणार असल्याचा आरोप करीत सुटले होते. या खोटारड्या प्रचारातूनही त्यांच्या हाती फारसे यश लागले नाहीच. सध्या त्यांनी निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उगारण्याची मोहीम सुरू केली आहे. लोकशाही व्यवस्थेत निवडणूक आयोगाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. देशातील जनतेचा या संस्थेवर विश्वास आहे. त्यामुळेच आयोगासारख्या संस्थेवर आरोप करताना तो प्रक्रियेच्या नियमांनुसारच केला जायला हवा. बिनबुडाचे आरोप करण्यासाठी कोणतेही विशेष कौशल्य लागत नाही. हे आरोप खोटे ठरल्यास मात्र त्याचे कायदेशीर परिणाम भोगावे लागू शकतात. म्हणूनच निवडणूक आयोगाने स्पष्ट सांगूनही राहुल गांधी शपथपत्रावर सही करण्यास तयार नाहीत. लोकसभा निवडणुकीत मतचोरीचा आरोप करणाऱ्या राहुल गांधी यांनी कर्नाटकातील महादेवपूर मतदारसंघात १ लाख २५० पेक्षा जास्त मतांमध्ये गैरव्यवहार झाल्याचा दावा केला होता. आता निवडणूक आयोगाने राहुल यांना याप्रकरणी पुरावे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. वास्तविक बिहारमध्ये निवडणूक आयोगाने ४० लाख मतदार मतदारयादीतून कमी केले त्यामुळे इंडी आघाडीचे धाबे दणाणले आहे व याविरोधात ते देशभर काहीतरी भयानक घडल्याचा कांगावा करीत आहेत. स्थलांतर, मृत्यू व इतर कारणांमुळे मतदारांची संख्या बदलू शकते हे वास्तव स्वीकारण्याचीही त्यांची तयारी दिसत नाही. त्यावरून वाद निर्माण करून अकारण जनतेच्या मनात संशय निर्माण करण्याचे काम त्यांनी चालवले आहे. परंतु प्रत्यक्षात बिहारच्या मसुदा यादीवर मात्र नऊ दिवसांनंतरही एकाही राजकीय पक्षाने आक्षेप नोंदवलेला नाही. या पार्श्वभूमीवर इंडी आघाडीच्या खासदारांनी सोमवारी संसद ते निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्याचा प्रयत्न केला. मोर्चासाठी पोलिसांची परवानगी घेण्याची साधी प्रक्रियाही या आघाडीने पूर्ण केली नव्हती. विरोधकांनी राज्यसभेतही यासंदर्भात घोषणाबाजी केली. त्यानंतर दुपारी दोन वाजेपर्यंत कामकाज तहकूब करण्यात आले. गेला काही काळ अशात्ऱ्हेने गोंधळ माजवून कामकाजात अडथळे निर्माण करण्याचे काम तेवढे विरोधक करताना दिसत आले आहेत. एकंदरच संभ्रम आणि गोंधळाचे वातावरण निर्माण करायचे व त्यातून आपला काही लाभ होतो का पहायचे एवढाच तूर्तास त्यांचा प्रयत्न दिसतो आहे.**

# चौलच्या प्राचीन इतिहासाचे साक्षीदार श्री मल्लेश्वर मंदिर

चौलचे प्राचिनत्व इ.स. पूर्व १२००पर्यंत नेता येते. प्राचीन इतिहास असलेल्या या नगरीत पुरातनकाळात चौल चंपावती नगरी या नावाने संबोधले जात असे.

प्राचीन काळात चौल व रेवदंडा या दोन्ही वैभवशाली शहरांना अन्यसाधारण महत्व असून ,येथून समुद्रमार्गे देशीविदेशी व्यापार होत असे, दोन्ही ठिकाणे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे केंद्र व प्रसिध्द बंदरे होती. शिवकाळात रेवदंडा पोर्तुगिजाचे वर्चस्वाखाली होते, येथे पोर्तुगिजानी आगरकोट किल्ला बांधला. पोर्तुगिजाच्या अंमलाखाली असलेल्या रेवदंडा विभागाला लोअर चौल तसेच चौल मध्ये सन १६८३ मध्ये संभाजी महाराजानी राजकोट किल्ला बांधला असा लिखीत उल्लेख सापडतो, मात्र राजकोट किल्ला व चौलवर नेहमीच मुघलाचे वर्चस्व राहून या भागाला नेहमी अप्पर चौल संबोधले जात असे. प्राचीन चौल चंपावतीनगरीचे शिवकाळात अप्पर चौल व लोअर चौल असे दोन भाग पडले गेले.

प्राचीन काळी या चंपावतीनगरीत १६०००० इमारती, तसेच ३६० मंदिरे व ३६० तलाव असल्याचे लिखित आहे, तर चौल भोर्सी, पेठ, गडगा, नवेदरपेठ,मळा, आदी१६ पाखाड्यात विभागलेले हे नगर होते. मुघल अमदानीत चौलमधील असंख्य म्राचीन, जागृत व भाविकांची श्रध्दास्थान असलेले अनेक प्रसिध्द मंदिरे उद्ध्वस्त करण्यात आली. चौल चंपावती देवी मंदिरानजीकच इतिहासकाळाचे साक्षीदार असलेले चौलचे भाविकांचे श्रध्दा व भक्तीचे स्थान प्रसिध्द जागृत श्री मल्लेश्वर मंदिर आजही पहाण्यास मिळते.

चौलचौकी ते रेवदंडा बायपास या रस्त्याला मोडकआळी नजीक श्री मल्लेश्वर मंदिर आहे,



इतिहासकाळाचे साक्षीदार असलेले हे श्री शंकराचे मंदिर एक जागृत देवस्थान म्हणून पुर्वीपासून प्रसिध्दीस आहे. नारळ पोफळीच्या गर्द छायेत हे श्री शंकराचे मंदिर मुख्यः रस्त्यालगत असल्याने नजरेत भरते, जुन्याकाळातील चौपाखी कौलारू व साधे बांधकामाचे श्री मल्लेश्वराचे मंदिर दुरूनच विलोभनिय वाटते, या मंदिराकडे पहाताच शांत, समाधानाची एक आगळीकता दृष्टीक्षेपात मिळते. या मंदिराचे प्रांगण म्हणजे एक भले मोठे पटागंण आहे. या भलेमोठे पटागंणात श्री मल्लेश्वरांची येथे उत्सव व जत्रेंचे आयोजन केले जात असावे असा कयास केला जातो. मंदिराचे समोरच सर्वसाधारण उंचीचे दोन दगडी दिपस्तंभ आहेत. या मंदिराच्या पटागंणाच्या लगतच समोरील बागायतीलगतच दगडी बांधीव पुष्करणी आहे पुर्वी ही पुष्करणी बागायतीच्या आत मध्ये होती. श्री मल्लेश्वर मंदिराचे समोरील दोन दगडी दीपस्तंभाच्या मधूनच मंदिराच्या प्रवेशव्दाराकडे जाता येते, जुन्या पध्दतीच्या बांधकामाचे मंदिरातील आतील सभागृहात लाकडी नक्षीकाम पहाण्यासारखे आहे. मंदिराच्या प्रशस्त सभागृहात अस्सल दगडी नंदीची मुर्ती आहे, या नंदीदेवतेस नमन करून मंदिराच्या गाभार्याकडे जाता येते. अंदाजे पाच ते आठ फुट लांबी रूंदीच्या गाभार्यात श्री शंकराची विलोभनिय पिंडी भाविकाला आपोआप नतमस्तक व्हायला लावते, मंदिराच्या गाभार्यात श्री शंभो सुमधूर आवाजाचा नाद मनाल वेगळीच शांती व समाधान देते. भाविकांच्या मनात श्री शंकराचा भक्तीचा मळा आपोआप फुलू लागतो. गाभार्यांच्या भोवती भाविकांना श्री शंकराच्या पिंडी भोवती फेऱ्या मारण्यासाठी जागा सोडण्यात आली आहे. गाभार्यांच्या उजव्या बाजूस दगडी आकाराच्या दोन मुर्ती आहेत, तेथून नतमस्तक भाविक काही वेळ मंदिराच्या सभागृहात बसून भक्तीभावाने श्री शंकराचे नामस्मरण करतो.

हे मंदिर प्राचीन आहे, मात्र शिवकाळात अंतिम पर्वात सन १७५८ च्या फेब्रुवारी महिन्यात या मंदिराचे बांधकाम अलिबागचे त्रिंबक महादेव डबीर यांनी केले असा उल्लेख आढळतो. या परिसरात श्री त्रिविक्रम नारायण मंदिराजवळ, आंबपुरी पाखाडीत मामलेदार बालाजी व दादाजी देशपांडे यांची हवेली असल्याचे लिखित आढळते. तर इ.स. १९७०मध्ये श्री मल्लेश्वर मंदिराजवळ चुन्याची भट्टी सुरू झाल्याचा उल्लेख आहे.

या मंदिराचे पुजाअर्चा नियोजन येथील पाखाडीतील ग्रामस्थ मंडळी करीत आहेत. श्री मल्लेश्वर मंदिरात दर सोमवारी भाविक नित्य भेटी देतात तर श्रावणी सोमवार व महाशिवरात्रीच्या दिवशी या ठिकाणी मोठया संख्येने भाविक येत असतात. चौल मधील श्री मल्लेश्वर मंदिर पुरातन मंदिर असून या मंदिराचा जिर्णोध्दार व्हावा अशी श्री मल्लेश्वर भाविकांची मनोकामना आहे.

**–महेंद्र खैरे,** रेवदंडा

# प्रसिद्ध गणेशमूर्तीकार बी.आर. खेडकर

छत्रपती शिवाजी महाराज, अहिल्यादेवी होळकर, महात्मा गांधीजी, स्वातंत्र्यवीर सावरकर, अण्णाभाऊ साठे, कर्मवीर भाऊराव पाटील अशा अनेक थोर व्यक्तींचे प्रमाणबद्ध पुतळे बनवून शिल्पकलेच्या क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटविणारे ज्येष्ठ शिल्पकार बी. आर. ऊर्फ अप्पासाहेब खेडकर यांचा आज जन्मदिन आहे.

नव्वद वर्षांच्या आयुष्यात अनेक शिल्पकृतींद्वारे त्यांनी आपल्या राज्याच्या कानाकोपऱ्यांत आपल्या खुणा ठेवल्या आहेत. तीन फुटांपासून साडेअठरा फूट उंचीच्या साडेचारशेहून अधिक ब्राँझ पुतळे साकारलेले खेडकर हे अव्वल दर्जाचे कलावंत होते.

कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाच्या आवारातील अठरा फुटी पुतळा त्यांच्याच कसबी हातातून साकारला आहे. प्रसिद्ध शिल्पकार विनायक पांडुरंग करमरकर यांनी घडविलेल्या शिवाजी महाराजांचा पुतळा पुण्यात आहे. त्यापासून अप्पासाहेबांना प्रेरणा घेतली. १२ ऑगस्ट १९२६ रोजी जन्मलेले खेडकर यांचे बालपण गरिबीत गेले, मात्र हातात कला होती. त्यांनी गणेशमूर्ती साकारण्यास सुरुवात केली. पुण्यात सोमवार पेठेत गणेशमूर्तींचा कारखाना सुरू केला. प्रमाणबद्धता, सुबकता, रेखीवपणा यांमुळे त्यांच्या मूर्ती भाविकांच्या आवडत.



पुण्यातील अनेक मंडळे गणेशमूर्ती खेडेकर यांच्याकडूनच करवून घेत. मूर्तिकामाबरोबर विविध सिनेमा कंपन्यांतील कला विभागातही ते काम करीत. या कामातून त्यांची आणि मुगल–ए–आझम चित्रपटाचे दिग्दर्शक के. आसिफ यांची भेट झाली. त्यांच्या शिल्पकलेचे कसब पाहून आसिफ यांनी 'मुगल ए आझम'च्या कला विभागाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली.

मुगल बादशहाचा काळ रूपेरी पडद्यावर साकारण्याला खेडकर यांची अशाप्रकारे मदत झाली आहे. याच चित्रपटात त्यांनी मधुबाला हिच्या चेहऱ्याचा रबरी मास्क हुबेहूब बनविला. एका नृत्य कलावंताने तो मास्क घालून 'प्यार किया तो डरना क्या' या गाण्यावर नृत्य केले आणि मधुबालाच्या नृत्याचा भास निर्माण केला. याच चित्रपटातील पृथ्वीराज कपूर, दिलीपकुमार, मधुबाला यांचे मोठे पुतळेही खेडकरांनी साकारले. १९६०नंतर त्यांनी चित्रपटक्षेत्राला रामराम करून शिल्पकलेला वाहून घेतले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बनविण्याची त्यांना प्रथम संधी मिळाली ती १९६१ साली. पहिला शाडूचा पुतळा पानशेतच्या पुरात वाहून गेला. त्यानंतर तो पुन्हा बनविला गेला आणि त्यानंतर ब्राँझचा पुतळा बनला. तो साताऱ्यात पोवई नाक्यावर आजही आहे. पुढे त्यांनी शिवाजी विद्यापीठातील पुतळा बनविला. तो उत्कृष्ट झाल्याने यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला गेला. त्यानंतर त्यांना अनेक मान–सन्मानांनी खेडकर गौरविले गेले. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# एआय व्हिडीओ टूल्सने छोटे रिअल व्हिडीओ बनवा

आता तुम्हाला व्हिडिओ बनवण्यासाठी महागडे कॅमेरे, जड लाईट्स किंवा फिल्म क्रूची आवश्यकता राहणार नाही. फक्त काही टेक्स्ट प्रॉम्प्ट, एक आयडिया आणि काही एआय टूलसच्या मदतीने तुम्ही ॲनिमेशनपासून फिल्मी व्हिडिओंपर्यंत काहीही बनवू शकता. मेटा–गुगल सारख्या मोठ्या टेक कंपन्यांनी अलीकडेच सामान्य वापरकर्त्यांसाठी उपयुक्त असे टूल्स लाँच केले आहेत.



**हे पाच उपयुक्त एआय टूल्स आहेत**

१. मेटा एआय : मेटा एआय तुम्हाला फक्त मजकूर टाइप करून लहान ॲनिमेटेड व्हिडिओ तयार करू देते. तुम्ही त्याच्याशी थेट व्हॉट्सॲप किंवा इंस्टाग्रामवर चॅट करता आणि ते ६ सेकंदांपर्यंतची व्हिज्युअल क्लिप तयार करते. हे एक मोफत टूल आहे.

२. गुगल एआय स्टुडिओ : हे गुगलचे वेब–आधारित व्हिडिओ जनरेशन प्लॅटफॉर्म आहे जिथे तुम्ही टेक्स्ट प्रॉम्प्ट एंटर करता आणि ते त्यातून व्हिडिओ तयार करते. याचे दोन मॉडेल आहेत. aistudio.google.com वर जा. यासाठी कोणतेही शुल्क नाही.

३. इनव्हिडिओ एआय : इनव्हिडिओ हे एक साधन आहे जे तुमच्या लिखित मजकुरातून संपूर्ण व्हिडिओ तयार करते, ज्यामध्ये क्लिप्स, पार्श्वभूमी संगीत, उपशीर्षके आणि व्हॉइसओव्हर समाविष्ट आहेत. रळ.ळर्पीळवशे.ळे ला भेट द्या. शैक्षणिक व्हिडिओंसाठी उपयुक्त.

४. क्लिंग एआय : क्लिंग एआय अधिक दृश्यमानतेने समृद्ध व्हिडिओ तयार करते. तुम्ही ते कोणत्या पात्रासारखे दिसावे, कोणते कपडे घालावे, स्थान काय असावे, कॅमेरा अँगल काय असावा हे सांगू शकता आणि त्यानुसार ते एक दृश्य तयार करते. app.klingai.com ला भेट द्या. मोफत आवृत्ती वॉटरमार्कसह येते.

५. रनवे एमएल : रनवे छायाचित्रे किंवा मजकूर, नंतर फोटो आणि नंतर हलणारे दृश्ये वापरून व्हिडिओ क्लिप तयार करते. ते व्हिडिओची लांबी स्थिर ठेवते आणि मूलभूत हालचाल जोडते. app.runwayml.com ला भेट द्या. तुम्ही २५ सेकंदांपर्यंतचा व्हिडिओ मोफत तयार करू शकता.

# भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार डॉ. विक्रम साराभाई



## निमित्त

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून विक्रम साराभाई ओळखले जातात. विक्रम अंबालाल साराभाई यांचा जन्म अमदावाद येथील एका संपन्न कुटूंबात १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला.

विक्रम साराभाई यांचे वडील हे एक उद्योगपती होते. त्यांचे बऱ्याच राजकीय व्यक्तिंशी त्यांचे संबध असल्याने रवींद्रनाथ टागोर, जवाहरलाल नेहरू, सरोजिनी नायडू, महात्मा गांधी आदी लोकांचे त्यांच्या घरी जाणे–येणे होते. विक्रम साराभाई यांच्या आई सरलादेवी यांनी आपल्या आठ मुलांच्या शिक्षणासाठी स्वतः ची मांटेसरी पद्धतीची शाळा काढली होती. या शाळेतच विक्रम साराभाईचे शिक्षण युरोपातून आलेल्या शिक्षकांद्वारे झाले. त्याना लहानपणापासूनच गणित आणि भौतिकशास्त्र हे विषय विशेष आवडत होते.

आपले बारावीपर्यंतचे शिक्षण आटपून १९३७ साली पुढील शिक्षणासाठी ते ब्रिटनमधील केंब्रिज विद्यापीठात शिकायला गेले, पण दुसरे महायुद्ध सुरू झाल्याने ते भारतात परत आले व त्यांनी बंगलोरमधील इंडियन इन्स्टियूट ऑफ सायन्समध्ये नोबेल पारितोषिक विजेते सर सी. व्ही. रामन यांच्या मार्गदर्शनाखाली वैश्विक किरणावर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी भरतनाट्यम, कुचिपुडी या नृत्यकलेत पारंगत असलेल्या प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिकेय आणि मल्लिका ही दोन अपत्ये झाली.


१९४५ साली दुसरे महायुद्ध संपल्यावर विक्रम साराभाई ब्रिटनला गेले. १९४७ साली त्यानी 'कास्मिक रे इन्वेस्टिगेशन इन ट्रापिकल लैटीट्यूड्स'वर संशोधन करून डॉक्टरेट मिळवली आणि त्याचवर्षी ते आपल्या मायदेशी परत आले. भारतात परत येऊन त्यांनी ११ नोव्हेंबर १९४७ला अहमदाबाद येथे फिजिकल रिसर्च लॅबोरेटरीची स्थापना केली. हे त्यांचे पहिले पाउल होते, पुढे जाऊन अवकाश संशोधनात विक्रम साराभाई यांनी भरीव कामगिरी केली.

विक्रम साराभाई यांनी अहमदाबाद येथील भारतीय प्रबंध संस्था (इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेन्ट) स्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. १९७५ मध्ये जो पहिला अंतरिक्ष उपग्रह आर्यभट्ट अवकाशात सोडला गेला त्याची रचना विक्रम साराभाई यांच्या अहमदाबाद रिसर्च सेंटर मध्येच केली होती. आर्यभट्टच्या यशस्वी प्रक्षेपणानंतर भारताने अनेक उपग्रह अवकाशात प्रक्षेपित केले. या यशामागे साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व यांचा मोलाचा वाटा आहे.

डॉ. विक्रम साराभाई यांना सन १९६६ साली पद्मभूषण आणि १९७२ साली मरणोत्तर पद्मविभूषण हे पुरस्कार भारत सरकारतर्फे देण्यात आले. ३१ डिसेंबर १९७१ साली केरळ राज्यातील कोवालम येथे रात्री झोपेतच हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. तिरुअनंतपुरम येथील थुंबा इक्वेटोरियल रॉकेट लॉन्चिंग स्टेशन आणि संबंधित अवकाश संस्थांचे नामकरण महान शास्त्रज्ञाच्या सन्मानार्थ विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे करण्यात आले.

**(साभार : विकासपीडिया)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# फिट राहायचेय तर 'या' पदार्थांचा वापर करा!

आजकल बदलत्या जीवनशैलीमुळे अनेकांचे वजन वाढत आहे. त्यामुळे फिगर चांगली व्हावी म्हणून अनेकजण फिटनेस सेंटरमध्ये घाम गाळत आहेत, परंतु कार्यालयातील बैठे काम आणि फास्टफूडचा वापर यामुळे वजनवाढ आणि बेढब शरीर ही आजकाल सर्वसामान्य समस्या झाली आहे.



लठ्ठपणा ही जगभरातील समस्या बनली असून त्यामुळे अनेक आजार शरीरात घर करुन राहीले आहेत. काही वनस्पती देखील वजन कमी करण्यास मदत करीत असतात. त्या कोणत्या ते पाहूयात..

जगभरातील लठ्ठपणामुळे जागतिक आरोग्य संघटनेने चिंता व्यक्त केली आहे. अनेकांना बदलत्या जीवनशैलीमुळे व्यायामासाठी वेळ काढता येणे अशक्य झाले आहे. त्यांच्यासाठी या सहा वनस्पती कामी येणाऱ्या आहेत.

**त्रिफळा** –त्रिफळा हे नावावरुनच तीन फळांचे मिश्रण असते. यात आमलकी, बिभीतकी आणि हरितकी या फळाचे मिश्रण असते. त्रिफळा आरोग्यासाठी खूपच गुणकारी आहे. याला पचन समस्येसाठी वापरले जाते. यामुळे पचनआणि एलिमिनेशन यात सुधारणा होऊन वजन घटविण्यास मदत मिळते.

**बडीशेप** –बडीशेप आपण जेवणानंतर माऊथफ्रेशनर म्हणून वापरत असतो. बडीशेफ ही वजन घटविण्यासाठी देखील फायदेशीर आहे. यात विरघळणारे फायबर आढळते. त्यामुळे आपल्याला बराच काळ पोट भरल्यासारखे वाटते. यामुळे भूक कमी होते. आणि पचन यंत्रणेत सुधारणार होते. त्यामुळे बडीशेफ खाण्याने वजन कमी होण्यास मदत मिळते.

**दालचिनी** –दालचिनी ही मसाल्यात वापरली जाते. प्रत्येक भारतीय घरात दालचिनी असते. यात थर्मोजेनिक गुणधर्म असतात. जे मेटाबॉलीजम वाढवितात, तसेच चरबी जाळण्यास मदत करतात.

**हळद** –हळदीत अनेक औषधी गुणधर्म आहे. अनेक भारतीय पदार्थांत हळद वापरली जाते. यातील एक्टीव्ह करक्यूमिनमध्ये ॲण्टी इफ्लेमेटरी गुण आढळतात. जे चरबी जमा होण्यास रोखतात.

**मेथीदाणे** –मेथीदाणेदेखील वजन कमी करण्यासाठी वापरतात. यातदेखील मोठ्या प्रमाणावर फायबर असते.त्यामुळे ते आपल्याला खूप काळ भूक लागू देत नाहीत. तसेच मेथीदाण्यांचा डाएटमध्ये समावेश केल्याने ब्लड शुगर लेव्हल देखील कंट्रोलमध्ये राहाते.

# नागोठणे पोस्ट ऑफिसची इमारत धोकादायक

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे पोस्ट ऑफिस कार्यालय असलेली इमारत अत्यंत जूनी इमारत असून ती पावसाळ्यात, वादळवारा किंवा अतिवृष्टीमुळे केव्हाही पडून मनुष्य हानी होईल अशी शक्यता असल्याने ही इमारतीचे पुन्हा बांधकाम करून नवी इमारत उभी करावी किंवा पोस्ट ऑफिस कार्यालय सुस्थितीत असलेल्या इमारतीच्या हलवावे अशा सूचना सन २०२१ पासून नागोठणे पोस्ट ऑफिसला वेळोवेळी नागोठणे ग्रामपंचायतीने पत्रव्यवहार करून दिल्या आहेत. दरम्यान ग्रामपंचायतीने वेळोवेळी सूचना करून सुद्धा पोस्ट ऑफिस कडून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप सरपंच सुप्रिया महाडिक यांनी केला आहे. दरम्यान नागोठणे पोस्ट ऑफिसने लवकरात लवकर उपाययोजना न केल्यास आम्हाला कायदेशीर कारवाई करावी लागेल असे पत्र देखील नागोठणे ग्रामपंचायतीने दिले असल्याची माहिती सरपंच सुप्रिया महाडिक यांनी दिली आहे. दरम्यान आम्ही पोस्ट ऑफिस कार्यालयासाठी पर्यायी जागा शोधली असून याबाबतचा प्रस्ताव अलिबाग येथील मुख्य कार्यालयात पाठवला असून त्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली की आम्ही नवीन जागेत पोस्ट ऑफिस कार्यालय शिफ्ट करू असे नागोठणे पोस्ट ऑफिस कार्यालयाचे सब पोस्ट मास्तर सुरज जुईकर यांनी दै. रामप्रहरशी बोलताना सांगितले.



नागोठणे ग्रामपंचायतीने पोस्ट ऑफिसला केलेल्या पत्रव्यवहारात म्हटले आहे की, शासन अध्यादेशानुसार आपणांस कळविण्यात आले येत आहे की, नागोठणे पोस्ट ऑफीस कार्यालय असलेली इमारत अत्यंत जूनी इमारत आहे. असल्याने ती पावसाळ्यात, वादळ्या-यात किंवा अतिवृष्टीमुळे केव्हांही पडेल व मनुष्य हानी होईल अशी शक्यता असल्याने जुन्या इमारतीचे त्वरीत स्ट्रक्चर ऑडीट करुन त्याचा अहवाल नोटीस मिळताच १५ दिवसांत नागोठणे ग्रामपंचायत कार्यालयाकडे सादर करावे. सदर पोष्ट ऑफीस कार्यालय इमारतीचे स्ट्रक्चर ऑडीट करुन घेणे बाबत घरमालकांकडे लेखी पत्रव्यवहार करुन देखील आजतायत कोणताही रिप्लाय दिलेला नाही. आपण पोष्ट ऑफीस इमारतीचा स्ट्रक्चर ऑडीट त्वरीत करुन त्याचा अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा. सदर इमारत पडून पोष्टात येणा-या नागरिकांच्या जिवितास धोका झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आपली राहिल अशा सूचना ग्रामपंचायतीने दिल्या आहेत.

# 'स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत विजयाची हंडी आम्हीच फोडणार'

**अलिबाग : प्रतिनिधी**

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका किंवा ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये विजयाची हंडी आम्हीच फोडणार, असा दावा अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांनी व्यक्त केला.विरोधकांकडे केवळ आरोप करण्याचं काम उरलं असल्याचं ते म्हणाले.

साई क्रीडा मंडळ, साई महिला मंडळ आणि झिराड ग्रामस्थ यांच्या वतीने अलिबाग तालुक्यातील झिराड येथे गोविंदा पथकांच्या सराव शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटनानंतर ते बोलत होते. दिलीप भोईर आणि मी एकत्र आल्याने अनेकांना आश्चर्य वाटलं आहे. परंतु भोईर शिवसेनेत आल्याने आमची ताकद वाढली आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती जिंकेल, असा विश्वास त्यांनी



व्यक्त केला. विरोधक केवळ आरोप करत आहेत. त्याकडे लक्ष देवू नका, असा सल्ला आमदार दळवी यांनी भोईर यांना दिला.

आपल्या विभागातील गोविंदा पथकांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी सराव शिबिराचे आयोजन केले हे कौतुकास्पद असल्याचे सांगत आ. दळवी यांनी भोईर यांच्या कामाचे कौतुक केले. समाजकल्याण सभापती म्हणून दिलीप भोईर यांनी खूप चांगले काम केले असल्याचे सांगत आगामी निवडणूकीनंतर त्यांना पुन्हा सभापतीपद देण्याचे सुतोवाच आमदार दळवी यांनी यावेळी केले.

आमदार महेंद्र दळवी आणि मी एकमेकांविरोधात लढलो, परंतु आम्ही एकत्र यावं ही नियतीची आणि जनतेची इच्छा होती ती पूर्ण झाली. आम्ही वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धा भरवून खेळाडूंना प्रोत्साहन देत असतो. जेणेकरून यातील एखाद्या खेळाडूने राज्यात, देशात नव्हे तर जगात नाव कमवावे हा आमचा उदात्त हेतू आहे. याचाच एक भाग म्हणून गोविंदा पथकांचे सराव शिबीर घेतल्याचे दिलीप भोईर यांनी सांगितले.

या सराव शिबिरात अलिबाग विधानसभा मतदारसंघातील ५६ पथके सहभागी झाली होती. महिलांसाठी चार थरांची तर पुरूषांसाठी पाच थरांची सलामी ठेवण्यात आली होती.

# मुरूड शहराचा विकास करीत असताना जनतेने जाण ठेवावी -आमदार महेंद्र दळवी





**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहराचा विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी गेल्या अडीच वर्षांमध्ये ३२० कोटींहून अधिक निधी मी मुरुड शहरासाठी मिळवून दिला आहे. रस्ते , मंदीरे , शाळा , समुद्र सुशोभिकरण ,उद्याने आदी विकास कामे प्रामाणिक पूर्ण केली आहेत .मुरुड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबंध असून मी केलेल्या विकास कामांची शहरातील नागरिकांनी सुधा जाण ठेवणे खूप आवश्यक आहे.

मी आपलाच आहे तुमच्या विकासाच्या मागण्या मी नेहमीच मान्य केल्या आहेत.असे महत्व पूर्ण प्रतिपादन स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांनी केले.त्यांच्या शुभहस्ते कोटेश्वर ग्राम देवता येथील भक्त निवास बांधण्याच्या कामाचे भूमिपूजन आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर आमदार महेंद्र दळवी, मुख्याधिकारी सचिन बच्छाव , तहसिलदार डफळ कोटेश्वरी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष नयन कर्णिक, पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे , माजी नगरसेवक अशोक धुमाळ , जिल्हा उप प्रमुख भरत बेलोसे , रुषीकांत डोंगरीकर , माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील , जिल्हा संघटिका तृप्ती पाटील ,मुरुड शिवसेना शहर अध्यक्ष संदीप पाटील, शिवसेनेचे बांधकाम अध्यक्ष दिनेश मिनमिणे,मनोहर गुरव ,मुरुड तालुका शिवसेना प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर तसेच देवस्थान ट्रस्टी व शिंदे शिवसेना गटाचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी आमदार महेंद्र दळवी आपल्या भाषणात म्हणाले की,शिवसेनेचे झुंजार नेते स्व .आनंद दिघे यांचे भव्य स्मारक उभारण्या साठी २५ कोटींचा निधी मंजूर झाल्याचे सांगुन श्री कोटेश्वर मंदीराच्या वेशीवर भव्य प्रवेशदार उभारणार असल्याचे सांगुन मुरुडच्या सर्वांगिण विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नसल्याची ग्वाही दिली .आगामी काळात मतदार संघाची पुर्नरचना झाली तरी आपण मुरुड जिथे जोडले जाईल तिथूनच उमेदवारी भरणार असे सुतोवाच ही केले.

कोटेश्वरी देवस्थान अध्यक्ष नयन कर्णिक यांनी आमदार दळवी यांनी भक्त निवास उभारणी साठी ३ कोटींचा भरघोस निधी दिल्या बद्दल जाहीर ऋण व्यक्त केले .

# मोरे महिला महाविद्यालयात एनएसएसतर्फे वृक्षारोपण

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील एम.बी.मोरे फाऊंडेशनचे कला वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय, धाटाव येथे ११ ऑगस्ट रोजी सुराज्य सामाजिक प्रतिष्ठान आणि महाविद्यालयाच्या एनएनएस समितीतर्फे संयुक्तरित्या 'वृक्षारोपण कार्यक्रम' आयोजित केला होता.

रोहा तालुका वनविभागातील अधिकारी प्रवीण शिंदे यांनी विद्यार्थिनींना वनसंपत्तीचे महत्व सांगितले आणि युवासंघटनांसोबत त्यांचा वनसंवर्धनासाठी काम करण्याचा मानसदेखील व्यक्त केला. महाविद्यालयाच्या पटांगणावर श्री. शिंदे, महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थिनींनी वृक्षारोपण केले.

या प्रसंगी वनविभागातील कर्मचारी ज्योति मिरगणे, मोरे महिला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रसन्न म्हसळकर, एनएनएस कार्यक्रम अधिकारी प्रा. ममता बिंद, प्रा. दर्शना शिंदे आणि सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानचे सदस्य आदर्श गायकवाड, ऋषिकेश जाधव यांच्यासह महाविद्यालयाच्या एनएनएसमधील ३२ विद्यार्थिनी उपस्थित होत्या.




# नेत्र व आरोग्य तपासणी शिबिर

## मुरुडमध्ये १२० रुग्णांनी घेतला उपक्रमाचा लाभ



**मुरुड : प्रतिनिधी**

मुस्लिम महिला संघटना पेठ मोहल्ला मुरुड - जंजिरा व लायन्स क्लब ऑफ मुरुड जंजिरा लायन्स क्लब ऑफ अलिबाग पोयनाड यांच्या विद्यमाने मुरुड येथील लायन्स विजन सेंटरमध्ये नेत्र शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.तसेच माधवबाग खोपोली यांचे तर्फे हेल्थ चेक अप कॅम्प आयोजित करण्यात आला होता.

मुस्लिम महिला संघटनेच्या अध्यक्ष सफिना उलडे, उपाध्यक्षा तरन्नुम फराश, सेक्रेटरी नाझीमा संदिलकर तसेच कमर कबले, तेहमीना फराश, तसनीम सियामवाला यांच्या पुढाकाराने आयोजन केले होते.

यावेळी ६० रुग्णांची तपासणी करण्यात आली व त्यात ८ रुग्ण मोतीबिंदू असलेले निघाले त्यांची पुढील आठवड्यात लायन्स फाउंडेशन चोंढी अलिबाग येथे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. यावेळी आरोग्य तपासणी मोठा प्रतिसाद मिळाला आहे.१२० रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली.यावेळी त्यांना मोफत औषध सुधा देण्यात आली.आहारात पाले भाज्या खाव्यात,पोटभर पाणी प्यावे,अशा बाबी त्यांना सांगण्यात आलेल्या आहेत.

यावेळी लायन्स क्लब ऑफ मुरुड -जंजिराचे अध्यक्ष सनी सोगावकर, खजिनदार मकरंद कर्णिक, लायन्स सदस्य नयन कर्णिक व नैनिता कर्णिक तसेच लायन्स क्लब ऑफ अलिबाग पोयनाड चे अध्यक्ष गुरुनाथ माळी उपस्थित होते.

# ग्रामस्थांच्या मदतीने नेरळ पोलिसांची एमडी ड्रग्ज कारखान्यावर धाड

## पाच जण अटकेत

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पाथरज ग्रामपंचायत हद्दीतील ताडवाडी येथे सुरू असलेल्या एमडी ड्रग्ज निर्मितीच्या कारखान्यावर नेरळ पोलिसांनी ग्रामस्थांच्या मदतीने मध्यरात्री छापा टाकून पाच जणांना अटक केली. या कारवाईत एक जण डी.फार्मसी शिक्षण घेतलेला असल्याचे समोर आले असून, आरोपी हे मुंबईतील विविध भागातील रहिवासी आहेत.



१० ऑगस्टच्या मध्यरात्री ग्रामस्थांना मारुती ब्रेझा कार, एक रुग्णवाहिका आणि डोक्यावर खोके वाहणारे काही तरुण दिसले. संशय आल्याने ग्रामस्थांनी घराला वेढा घालून आत प्रवेश केला असता पाच जण विविध रंगांची रसायने मिसळून गरम करताना आढळले. तत्काळ नेरळ पोलिस ठाण्याचे अधिकारी शिवाजी ढवळे पथकासह घटनास्थळी दाखल झाले आणि पाच जणांना ताब्यात घेतले.

पोलिस पाहताच काही आरोपींनी रसायन जमिनीवर ओतले आणि मोबाईल फोडले, मात्र काही मोबाईल आणि रासायनिक पदार्थ पोलिसांच्या हाती लागले. घटनास्थळी मोठ्या प्रमाणात बर्फाच्या लाद्या, कागदी खोके व संशयास्पद रसायने जप्त करण्यात आली. प्राथमिक पाहणीत हा एमडी ड्रग्ज निर्मितीचा प्रकार असल्याचा अंदाज असून, फॉरेन्सिक तपास सुरू आहे. सद्यप्रकरणात आणखी१२ जण सामील असल्याचा संशय असून,एक महिला व रुग्णवाहिका चालक फरार आहेत.

# ललित पाटील मित्र मंडळ, रोटरी क्लब व मेडिकोर हॉस्पिटलच्या वतीने आरोग्य शिबिर

**पेण : प्रतिनिधी**

पेण विधानसभा मतदार संघाचे आमदार रविशेठ पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ललित पाटील मित्र मंडळ, रोटरी क्लब पेण व मेडिकोर हॉस्पिटल खारघर यांच्या वतीने आगरी समाज हॉल येथे वतीने आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराचे उदघाट्न मान्यवरांचा उपस्थितीत संपन्न झाले यावेळी युवा नेते ललित पाटील, रोटरी क्लबचे अध्यक्ष सचिन शिगवण, मा. नगरसेवक अजय क्षिरसागर, प्रकल्पप्रमुख मितेश शहा, हितेश पाटील, रोहन मनोरे आदींसह रोटरीचे सदस्य, ललित पाटील मित्रमंडळाचे सदस्य, वैद्यकीय पथक उपस्थित होते. यावेळी रुग्णांची ईसीजी, बीएमडी (हाडांची घनता), मधुमेह तपासणी आदींची तपासणी करण्यात आली.

यावेळी आमदार रविशेठ पाटील, मा. नगराध्यक्ष प्रितम पाटील, गटनेते अनिरुद्ध पाटील, भाजप शहर अध्यक्ष रविंद्र म्हात्रे, मा. जि. प. सदस्य डी. बी. पाटील, मा. नगरसेवक ज्योती म्हात्रे आदी मान्यवरांनी शिबीराला भेट दिली. यावेळी जवळ जवळ १५० लोकांची तपासणी करण्यात आली.



# भुवनेश्वरच्या राजाचे जल्लोषात आगमन



**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील चलचित्रासाठी प्रसिद्ध असलेल्या जय गणेश मित्र मंडळ भुवनेश्वरच्या लाडक्या भुवनेश्वरच्या राजाचे रविवारी सायंकाळी ढोलताशांच्या जल्लोषात आगमन झाले आहे.

यावेळी कार्यकर्त्यांनी आपल्या लाडक्या बाप्पाचे जल्लोष स्वागत केले असून भव्य मिरवणूक रोहा शहरातून व भुवनेश्वर येथून आगमनाची काढली होती.

जय गिरोबा अंधारआळी गोविंद पथकाने पाच थर लावून भुवनेश्वरच्या राजाला सलामी दिली आहे.कामगार चळीवळीतुन उभे राहीलेले जय गणेश मित्र मंडळ भुवनेश्वर हे रायगड जिल्ह्यातील पहिले गणेश उत्सव मंडळ आहे. या मंडळाचा देखावा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने गणेशभक्त येत असतात.


Hon'ble Godse Madam Court

Adv. N. V. Dhongadi
Adv. For Applicant
Next Date: 08/02/2022

**PUBLIC NOTICE**

**IN THE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION PANVEL, AT PANVEL**
**CIVIL MISC. APPLICATION NO. 924 OF 2025**

नि. 7
ने.ता. 8/10/25

1. Mr. Jayanta S/o Hirenda Chandra Dey
2. Sriyan Jayanta Dey through his guardian father Mr. Jayanta Dey .......................... **Applicant**

**V/s.**

NIL ................ **Non Applicant**

It is hereby informed to the public at large that Late Sreeya Jayanta Dey ('Deceased) who is the wife of Applicant no. 1 and mother of Applicant no. 2, has died on dated 02/12/2021 at Uran, Raigarh, Maharashtra - 400702. That the Deceased died intestate and at the time of her death she was the co-owner of Flat No.303, 3rd Floor, Building No.11, admeasuring are 50.07 Sq. mtrs. Carpet, i.e. 538.95 sq. feet Carpet, Usable Balcony 5.33 sq.mtr. i.e. 57.37 sq. feet, in Hill View Apartment, at Survey No.34/1, 36/5, 120, at Village Mohape, Tal. Panvel, Dist. Raigarh 410221, along with her husband Mr. Jayanta Dey S/o Hirenda Chandra Dey (In this property Deceased had equal ownership rights along with her husband Mr. Jayanta Dey S/o Hirenda Chandra Dey).

That consequent on the death of the Deceased, applicants being the sole legal heirs and / or the legal representatives of the Deceased as per the Hindu Succession Act 1956 has filed application u/s 2 of the Bombay Regulation Act No. VIII of 1827 for being declared as the legal heirs of the Deceased in respect of the abovesaid property.

Anybody having any claim, objection against, in, to or upon the above said property, or the applicants being declared as the legal heirs of the Deceased in respect of the abovesaid property shall notify the same in writing within 30 days from the date hereof along with the supporting documentary evidence to the Hon'ble Court, failing which the Heirship Certificate will be issued in accordance with law.

By order

Date : 07/08/2025
Place : Panvel

Court Seal Stamp

**Sd/-**
Superintendent Civil Judge (SD) Panvel



महावितरण

**निविदा सूचना**

अलिबाग विभागाअंतर्गत महाराष्ट्रातील विविध स्टोअरमधून प्राप्त झालेले ९ M.T प्रति पॅकेज पर्यंत वजनाचे साहित्य/उपकरणे यांच्या वाहतुकीसह साहित्य हाताळणीसाठीच्या कराराकरिता नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत त्याचा तपशील खालील प्रमाणे:

| निविदा क्रमांक | विभाग |
|---|---|
| स्टोर ट्रांसपोर्ट/काअ/अलिबाग/टि-१४/०८-२०२५ | अलिबाग |

अंदाज पत्रकीय रक्कम :- प्रत्येकी ०५.०० लाख
निविदा भरण्याची अंतिम दिनांक :- १७/०८/२०२५
अधिक माहितीसाठी पुढील संकेत स्थळावर संपर्क साधावा.
https://etender.mahadiscom.in/eatApp/

**PRO NO.- 224** **कार्यकारी अभियंता,** अलिबाग विभाग



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर सूचना देण्यात येते की, श्रीमती दया अजय टिळवे यांच्या मालकीचे प्रत्यक्ष ताबेकब्जातील मौजे वावर्ले, ता. खालापूर, जि. रायगड येथील खालील नमूद शेतजमिन मिळकती आमचे अशिल हे कायमस्वरूपी विकत घेणार आहेत.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे वावर्ले, ता. खालापूर, जि. रायगड**

| अनु.क्र. | गट व उपविभाग क्र. | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १ | ४१९ | ०-४३-९०<br>पो.ख. ०-०२-४० | ०.७१ |
| २ | ४२० | ०-२०-१०<br>पो.ख. ०-००-८० | १.६२ |
| | **एकूण क्षेत्र** | **०-६७-२०** | |

तरी सदरहू मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदिल, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधीतांनी आपाआपल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत आपल्या हरकती नोंदवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत हे सर्व लोकांस कळावे.

दिनांक : ११/०८/२०२५
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**आनंद वाय. धोंगडे**
ॲडव्होकेट

ए/१०३, पहिला मजला, ए-विंग, नील सिद्धी एमराल्ड, प्लॉट नं. ५२७ बी, तहसील कार्यालयाजवळ, पनवेल - ४१०२०३ मो. ७५०६४९८५०३

# दहीहंडी मंडळांना पोलिसांकडून सूचना

## उरण पोलीस ठाण्यात बैठक

**उरण : वार्ताहर**

उरण पोलीस ठाणे हद्दीतील सार्वजनिक दहीहंडी उत्सव मंडळाच्या पदाधिकारी, पोलीस पाटील यांची नवी मुंबई सहाय्यक पोलीस आयुक्त (पोर्ट विभाग) किशोर गायके यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि.७) उरण पोलीस ठाण्यात बैठक घेण्यात आली.

दहीहंडी उत्सवात दिलेल्या नियमाचे पालन करावे. ध्वनी प्रदूषण होणार नाही याकडे लक्ष द्या. माननीय न्यायालयाने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे. कार्यक्रमादरम्यान रहदारीचा अथवा आजूबाजूच्या लोकांना त्रास होणार याची खबरदारी घ्यावी. सर्व सबंधित विभागाची परवानगी परवानगी घेणे बंधनकारक आहे. लहान मुलांच्या सुरक्षितेबाबत



काळजी घ्यावी. सुरक्षा रक्षक नेमावे, प्रथमोपचार साहित्य बाळगावे, शेवटच्या थरा बाबत सेफ्टी बेल्ट वापरण्यात यावा. फायर ब्रिगेडची व्यवस्थाकरण्यात यावी. डॉक्टर व ॲम्बुलसची व्यवस्था करावी. सर्व गोविंदा पथकाने इंसुरंस काढण्यात यावे दही हंडी उत्सव मंडळांनी नोंदणी करावी. जागा मालक, नगर परिषद, ग्रामपंचायत व संबधित जागा मालकांची परवानगी घ्यावी. तात्पुरते विद्युत कनेक्शन घ्यावे, स्टेज व मंडप मजबूत असावे. याबाबत तज्ञ अथवाअभियंता, झथऊविभागाचे अभियंता यांच्या कडून तपासणी करून घ्यावी, दहीहंडीचे थर कमीत-कमी लावण्यात यावे, असे यांची नवी मुंबई सहाय्यक पोलीस आयुक्त (पोर्ट विभाग) किशोर गायके यांनी मार्गदर्शनात सांगितले.

या वेळी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, पोलीस निरीक्षक कारवाणी, सार्वजनिक दहीहंडी उत्सवाचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# पनवेलच्या प्राचीन स्मशानभूमीसंदर्भात प्रस्ताव नाही -आयुक्त मंगेश चितळे

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलची प्राचीन स्मशानभूमी इतरत्र स्थलांतरीत करण्याचा कोणताही प्रस्ताव प्रशासनासमोर नसल्याचे आयुक्त मंगेश चितळे यांनी आजच्या बैठकीत आश्वासन दिले आहे.

शिवसेनेचे स्थानिक नेते चंद्रशेखर सोमण यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाचे पनवेल अमरधाम स्मशानभूमीच्या दुरवस्थेचे चर्चा व फोटो सहीत महापालिका आयुक्तांना निवेदन सादर करण्यात आले. महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी सदर विषय सामाजिकदृष्ट्या अतिशय संवेदनशील आणि महत्वाचा असल्याचे मान्य केले.

सर्व गैरसोयी दूर करण्याबरोबरच सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासाठी प्रशासक या नात्याने आपण तातडीचा २५ लाखांचा निधी मंजूर करावा व इतर गैरप्रकार टाळण्यासाठी महानगरपालिकेने थेट नियंत्रण ठेवून दिवसरात्र सुरक्षा रक्षकांची नेमणूक करावी ही तातडीची मागणी या चर्चेदरम्यान शिवसेनेच्या शिष्टमंडळाने केली. यावर आयुक्तांनी महानगर क्षेत्रातील साधारणात ७१ च्या वर स्मशानभूमींचा आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरू असताना, पनवेल शहरातील ही मुख्य स्मशानभूमी कशी काय दुर्लक्षित झाली असा प्रश्न शहर अभियंता संजय कटेकर यांना विचारला. त्याचप्रमाणे पनवेलची प्राचीन स्मशानभूमी इतरत्र स्थलांतरीत करण्याचा कोणताही प्रस्ताव प्रशासनासमोर नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

या बैठकीत चंद्रशेखर सोमण, सामाजिक कार्यकर्ते अनिलकुमार कुळकर्णी, उपमहानगर प्रमुख महेश सावंत, शहरप्रमुख प्रसाद सोनावणे, उपशहर संघटक सुजन मुसलोंडकर, सिद्धेश खानविलकर, खंडेश धनावडे, प्रभाग १८ चे विभाग प्रमुख शाम देशमुख इ. कार्यकर्ते उपस्थित होते.

# सामाजिक उपक्रमांमुळे मिळालेल्या शुभेच्छा आयुष्यात महत्त्वाच्या

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे खारघरमधील कार्यक्रमात प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपण वाढदिवसाला सामाजिक उपक्रम राबवून सेवा करतो त्याबद्दल समाज आपले आभार मानतो आणि या शुभेच्छा आपल्या आयुष्याला महत्वाच्या ठरतात, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर विविध योजनांच्या कार्ड वाटप कार्यक्रमावेळी केले. या वेळी त्यांनी पुस्तक भेट देऊन माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय यांच्या वाढदिवसानिमित्त खारघरमधील नागरीकांना ई-श्रम कार्ड आणि आयुष्मान भारत कार्ड वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच पनवेल महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत तसेच माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय आणि भाजप नेते अमर उपाध्याय यांच्या माध्यमातून ६३ महिलांना शिवणकामाचे प्रशिक्षण देण्यात आले होते. या महिलांना प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून नागरीकांना ई श्रम कार्ड, आयुष्मान भारत कार्ड आणि महिलांना प्रमाणपत्राचे वाटप करून हर्षद उपाध्याय यांनी राबवलेल्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चिटणीस ब्रिजेश पटेल खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, गुरुनाथ गायकर, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, हर्षदा उपाध्याय, सरचिटणीस दीपक शिंदे, भाजप नेते वासुदेव पाटील, समीर कदम, अमर उपाध्याय, युवामोर्चाचे खारघर शहर अध्यक्ष नितेश पाटील, मधूमिता जिना, शामला सुरेश, रजनी शर्मा, गायत्री दुबे आदी उपस्थित होते.

# नेरूळ येथे हॉस्पिटलला आग

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नेरूळ येथील सुश्रुषा हॉस्पिटलच्या तळघरात आग लागल्याची घटना सोमवारी दुपारी १२ च्या सुमारास घडली. एसीला आग लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे, मात्र अग्निशमन दलाच्या तत्काळ कारवाईमुळे मोठा अनर्थ टळला असून, हॉस्पिटलमधील सर्व रुग्णांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले आहे.

आगीची माहिती मिळताच वाशी आणि नेरूळ अग्निशमन दलाच्या एकूण चार गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने आग विझवण्यास सुरुवात केली आणि काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवले.

या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. अग्निशमन दलाच्या जवानांनी सर्व २१ रुग्णांना सुरक्षितरित्या बाहेर काढले. त्यापैकी २० रुग्णांना सुश्रुषा हॉस्पिटलच्या पनवेल शाखेत हलवण्यात आले आहे, तर एका रुग्णाला वाशी येथील फोर्टिस हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. हॉस्पिटल प्रशासनाने सर्व रुग्ण सुस्थितीत असल्याची माहिती दिली आहे.

# 'सीकेटी'त स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांकडून रक्षाबंधन साजरे



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनाचा कार्यक्रम केला.

गेली कित्येक वर्ष स्काऊट गाईड हा उपक्रम शाळेत राबविला जात असतो. विद्यार्थ्यांना स्वयंशिस्त, सामाजिक बांधिलकी, देशप्रेम या मूल्यांचे महत्व समजावे या उद्देशाने हा उपक्रम शाळेत राबविला जातो.

या वेळी शाळेचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, अशोक पाटील, गाईड गायत्री पाटील त्याचप्रमाणे सर्व शिक्षक उपस्थित होते. बंधुत्वप्रेम भावना प्रगट करणारा कार्यक्रम फार सुंदररित्या पार पाडण्यात आला. सामाजिक वारसा जपण्याचा वसा घेणारे हे सीकेटी माध्यमातील विद्यार्थ्यांनी बहिण भावाचे प्रेम राखी बांधून व गोड तोंड करून रूढी परंपरेनुसार हा सण शाळेमध्ये साजरा केला.

# वाशीत उद्या श्रावणरंग कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई स्वयंसेवी समन्वय संस्था मराठी साहित्य संस्कृती व कला मंडळ प्रा. माणिकराव कीर्तने वाचनालय आणि नवी मुंबई म्युझिक अँड ड्रामा सर्कल, वाशी यांच्या सौजन्याने श्रावणरंग २०२५ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी (दि.१३) वाशी सेक्टर ६ येथील साहित्य मंदिर सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सायंकाळी ५.३० वा कार्यक्रमास सुरुवात होणार आहे. गायन, नाट्य, काव्य, नृत्य व वादन असे विविध कार्यक्रम सादर केले जाणार आहेत. एकच सभागृहात विविधरंगी कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना अनुभवता येणार आहे. कार्यक्रमात मोफत प्रवेश ठेवण्यात आला असून, तीन भाग्यविजेता प्रेक्षकांना पारितोषिक देण्यात येणार असल्याचे आयोजकांनी माहिती देताना सांगितले.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आवाज इंडिया टीव्ही चॅनेलचा शुभारंभ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गोरगरिबांवर होणारा अन्याय आणि सामान्य नागरिकांचे प्रश्न वरिष्ठ पातळीवर पोहचवण्यासाठी आवाज इंडिया टीव्ही चॅनेल काम करेल, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वाशी येथे चॅनेलच्या शुभारंभावेळी केले.

आवाज इंडिया टीव्ही चॅनेलने ओटीटी प्लॅटफॉर्मवर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. आता या चॅनेलचे नवी मुंबई आणि रायगड परिसरात पदार्पण झाले आहे. यानिमित्त वाशी येथे गर्जा महाराष्ट्र या संगीत कार्यक्रमाचे आयोजन करून चॅनेलचा शुभारंभ सोहळा रविवारी झाला.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते चॅनेलचे उद्घाटन झाले असून त्यांनी



या वेळी आवाज इंडिया टीव्ही चॅनेलच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देत हे चॅनेल समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी एक महत्त्वाचे माध्यम ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

या वेळी माजी राज्यमंत्री अविनाश महातेकर, आरपीआयचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सुरेश बारशिंग, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, काँग्रेसचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष अरविंद नाईक, सामाजिक कार्यकर्ते निशांत भगत, आरपीआयचे नवी मुंबई जिल्हा प्रमुख महेश खरे, आवाज इंडिया मराठी टीव्ही चॅनेलच्या संपादक राही भिडे, ब्युरो हेड योगेश महाजन, पीआर प्रतिनिधी विलास भोसले, विनोद पार्टे, हाजी शहनवाज खान, विलास चव्हाण आदी उपस्थित होते.

# श्री ब्रम्हचैतन्य संगीत सभा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे ४५ वे पुष्प संपन्न झाले. पनवेल येथील गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रात सादर झालेल्या संगीत सभेत ठाणे येथील युवा गायिका सानिका राजवाडे-नातू यांनी आपली संगीत सेवा सादर केली.

विदुषी अपूर्वा गोखले यांच्या शिष्या असलेल्या सानिका राजवाडे यांनी संगीत सभेच्या सुरुवातीला पुरिया रागातील बंदिश सादर केली. ओंकार प्रधान, सुंदर ते ध्यान, अमृतहुनी गोड या अभंगांचे सादरीकरण केले. हरी म्हणा तुम्ही गोविंद म्हणा या गजराने त्यांनी संगीत सभेची सांगता केली. रत्नागिरी येथील युवा तबला वादक अमेय भडसावळे याने तबलासाथ, सोहम जोशी यांनी संवादिनीसाथ आणि चैतन्य कोशे यानी तालवाद्य साथ केली. समीर सोमण यांनी निवेदन केले.






# नवीन पनवेलमध्ये संस्कृत दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील रामचंद्र मिशन येथे संस्कृत दिनानिमित्त संस्कृत भारती परिचय असा कार्यक्रम झाला. शंभरहून अधिकांची उपस्थिती होती. कार्यक्रम समाधानकारक झाला असून रामचंद्र मिशनचे साधक आणि संस्कृत भारतीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

संस्कृत भारतीच्या वतीने अनया करंदीकर यांचे उद्बोधक व मार्गदर्शनपर व्याख्यान झाले तसेच डॉ. वैष्णवी जुगदार यांनी सूत्रसंचालन केले. रामचंद्र मिशनचे श्री निलेश श्री बालसुब्रमण्यम गीतांजली भगिनी यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामचंद्र मिशनचे डॉ.तारक मेहता होते. त्यानंतर त्यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले.

# समूहगान स्पर्धेत सीकेटी विद्यालयाचे सुयश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत विकास परिषद, पनवेल द्वारा आयोजित राष्ट्रीय समुह गान स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमाने उत्तेजनार्थ बक्षिस प्राप्त केला आहे.

या स्पर्धेत 'राष्ट्रीय चेतना के स्वर' या पुस्तिकेतील एक हिंदी आणि एक संस्कृतगीत स्वरबद्ध करून सादर करणे सहभागी संघांना बंधनकारक होते. सहावी ते बारावी असा वयोगट होता. सीकेटी इंग्रजी माध्यमातील सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांनी 'अब जाग उठो, कमर कसो' हे हिंदी गीत तसेच 'जय तू जननी जन्मभूमी' हे संस्कृत गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या विद्यार्थ्यांना रूपेश मढवी आणि संतोष खरे या संगीत शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.







**पनवेल :** श्रावण महिन्याचे औचित्य साधून वंदे मातरम इको टॅक्सी चालक मालक संघटनेच्या वतीने श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन गाढेश्वर येथील शंकर मंदिरात सोमवारी करण्यात आले होते. या पुजेला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत श्री सत्यनारायणाचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी सुधीर कांडपिळे, विजय पाटील, कामगार नेते रवि नाईक, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुलोचना कल्याणकर, माजी पं.स. सदस्य राज पाटील तसेच रवींद्र कुडूस, अंकुश पाटील, दीपक नावडेकर, गजानन भागवत, संतोष म्हात्रे, संदीप भगत, मदन पारवे, चंद्रकांत पाटील, मच्छिंद्र पाटील आदी उपस्थित होते.

राम प्रहर श्रावणधारा

## श्रावण

सरीवर सरी कोसळून दमल्या
झाली रिमझिम श्रावणाची सुरू
आल्हादायक वातावरणात या
झाला ऊनपावसाचा खेळ सुरू

निर्मळ सुंदर झरे वाहती
खळखळ मधुर नादमयी
पवित्र श्रावण महिन्यात
वृत्तवैकल्याचीच सरबराई

हिरवाईने नटली वसुंधरा
देत सुखसमृद्धीची चाहूल
निर्मळ सुंदर ठेवून अंतर
सत्ककर्माकडे पडावे पाऊल

पावसाच्या दानत्वाने तृप्त झाले
डोंगर, दऱ्या, नदी, नाले, झरे
पाहूनिया निसर्गाची किमया
मन हृदय आनंदाने भरून उरे

सोनेरी उन्हासवे खेळण्यास
येती रिमझिम रिमझिम सरी
लपंडाव पाहूनिया हा नाचरा
वाराही तयाभोवती फेर धरी

सहा ऋतुत इथे रंगता हे जीवन
मोरपंखी निसर्गावर जडे वेडे मन
फिरुनी अनुभवण्या या अनुभूती
पुन्हा पुन्हा इथे वाटे घ्यावा जन्म



-सायराबानू वजीर चौगुले,
माणगाव


# कोलाड-खांब परिसरात विजेचा लपंडाव

## नागरिक त्रस्त; ऐन सणासुदीत कामांचा खोळंबा

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात खांब कोलाड परिसरात महा वितरण कंपनी कडून वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने या परिसरातील व्यावसायिकांसहित नागरिक कमालीचे हैराण झाले आहेत. विजेच्या अनियमित पुरवठ्यामुळे नागरिकांचे जीवन त्रस्त झाले आहे. यामुळे महावितरण कंपनीच्या मनमानी कारभारावर मोठी संतापाची लाट उसळली आहे. तर दिवसातून तीनचार वेळा वीज खंडित होत आहे तर आठवड्यातून तीन ते चार दिवस ग्राहक वर्गाला कोणतीही सुचना न देता वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

कोकणात गौरी गणपती उत्सव हा मोठया उत्सहात साजरा केला जातो. या उत्सवाला १५ दिवस शिल्लक असल्यामुळे या परिसरात रंगरंगोटी, डेकोरेशन, यासाठी नागरिक कामाला लागले आहेत. जो तो आपले काम सांभाळून कामावरून येऊन काम करीत आहेत, परंतु वारंवार विद्युत पुरवठा बंद होत असल्यामुळे नागरिकांच्या अडचणीत वाढ होतांना दिसत आहे.



तसेच शासकीय आणि निमशासकीय कार्यालये, बँका, झेरॉक्स सेंटर, ई सेवा केंद्र, तसेच घरगुती ग्राहकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. कोलाड परिसरातील महावितरणच्या हलगर्जीपणामुळे सर्व सामान्य जनतेला त्रास सहन करावा लागत आहे. वीज पुरवठ्यातील या अनियमिततेमुळे अनेक ठिकाणी कामांमध्येही अडथळे निर्माण होत असल्याचा संताप नागरिकांकडून होत आहे तसेच वेळेवर वीजबिल भरण्यासाठी दबाव टाकणारे अधिकारी, वीज पुरवठ्याच्या समस्या सोडवण्यात अपयशी ठरल्याचा आरोप स्थानिक ग्राहक मंडळींकडून व्यक्त केला जात आहे.

> कोलाड खांब परिसरातच नव्हे तर रोहा तालुक्यात महावितरण कंपनीचे कर्मचारी अदानी कंपनीचे मिटर बदलण्यात व्यस्त आहेत. तेही ग्राहकांना कोणतेही पुर्व सूचना न देता हे मिटर बदलले जात आहेत. यामुळे वारंवार होणाऱ्या वीज खंडितकडे यांचे लक्ष राहिले नाही. महावितरणने वेळेत या समस्यांकडे लक्ष देऊन उपाययोजना करावी, तसेच वीज पुरवठा खंडित करण्याआधी ग्राहकांना वेळीच सूचना करण्यात यावी अन्यथा जन आंदोलन करण्यात येईल.
>
> **-दिनकर सानप, सामाजिक कार्यकर्ते, पुई कोलाड विभाग**

# लीड स्कूलमध्ये सीबीएसई शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा



**माणगाव : बातमीदार**

लीड स्कूल माणगाव येथे नुकतीच दोन दिवसीय सीबीएसई शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा झाली. या कार्यशाळेत पनवेल येथील शांतिनिकेतन स्कूल, रोहा येथील ग्रेगोरियन स्कूल यांसह विविध सीबीएसई शाळांमधील शिक्षकांनी सहभाग घेतला. कार्यशाळेचे प्रमुख उद्दिष्ट शिक्षकांना नवीन अध्यापन पद्धती, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत शिक्षणातील नवकल्पना, आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक कौशल्ये प्रदान करणे हे होते.

या प्रशिक्षण सत्राचे मार्गदर्शन जे.एम. राठी स्कूल, रोहा येथील प्राचार्य प्रशांत मुळे आणि ट्री हाऊस स्कूल, पेन येथील प्राचार्या श्रीमती अर्चना चव्हाण यांनी केले. त्यांनी शिक्षकांना अनुभवाधारित शिक्षण, विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याच्या प्रभावी पद्धती, आणि अध्यापनातील नवकल्पनांबाबत मार्गदर्शन केले.

लीड स्कूल माणगावचे प्राचार्य बसवराज जगये यांनी सांगितले की, ही कार्यशाळा आमच्या शिक्षकांसाठी एक उत्तम संधी ठरली आहे. या माध्यमातून शिक्षकांना अध्यापन अधिक प्रभावी आणि विद्यार्थ्यांसाठी आकर्षक कसे बनवता येईल, याबाबत नवीन दृष्टिकोन मिळाला आहे. त्यांनी पुढे सांगितले की, सीबीएसईच्या प्रशिक्षण धोरणांनुसार, शिक्षकांनी दरवर्षी ५० तासांचे व्यावसायिक प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे, आणि अशा कार्यशाळा त्यासाठी उपयुक्त ठरतात.

कार्यशाळेत सहभागी शिक्षकांनी विविध उपक्रमांद्वारे अनुभवाधारित शिक्षण, डिजिटल साधनांचा वापर, आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याची काळजी घेण्याच्या पद्धती याबाबत सखोल माहिती मिळवली. या प्रशिक्षणामुळे शिक्षकांचे कौशल्यवर्धन होऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

लीड स्कूल माणगावने अशा प्रकारच्या प्रशिक्षण कार्यशाळा नियमितपणे आयोजित करून शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाला चालना दिली आहे. या उपक्रमामुळे परिसरातील शाळांमध्ये शिक्षणाची गुणवत्ता वाढण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# स्नेहवर्धिनी सामाजिक संस्थेतर्फे अंधश्रद्धा निर्मूलन व्याख्यान



**पेण : प्रतिनिधी**

स्नेहवर्धिनी सामाजिक संस्थेच्या माध्यमातून रोहा तालुक्यातील वरसे या गावात आदिवासी समाज्यासाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा चमत्कारामागील विज्ञान आणि बुवाबाजी हे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या वेळी व्याख्याते संदेश गायकवाड यांनी बाबा, बुवा, भगत, मांत्रिक कसे फसवतात याचे प्रात्यक्षिक करून दाखविली. तसेच अशा भोंदू बाबाच्या नादी न लागता विज्ञानाची कास धरावी, असे सांगितले.


या कार्यक्रमास रायगड जिल्हा अध्यक्ष विवेक सुभेकर सरांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आपल्या आजूबाजूला असलेले बाबा महाराज आपली आर्थिक, सामाजिक आणि लैंगिक शोषण कसे करतात व त्यापासून आपण कसं सावध राहायला हवं या बाबतीत माहिती दिली.

कार्यक्रमाला लेखक कवी श्रीनिवास गडकरी, नंदकिशोर राक्षे, दिनेश शिर्के, खांडेकर आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्नेहवर्धिनी सामाजिक संस्था आणि चर्च च्या व्यवस्थापने प्रचंड मेहनत घेतली. या सोबत रोहा मअंनिसच्या सर्व कार्यकर्त्यानी उपस्थिती दाखविली.

# कापडे बुद्रुक येथे रक्षाबंधनानिमित्त सिस्केप संस्थेतर्फे पर्यावरण राखी उत्सव

**महाड : प्रतिनिधी**

सिस्केप महाड संस्था आणि प्रिव्ही-प्रिजीव स्पेशालिस्ट कंपनी महाड एमआयडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने मगर संवर्धन जनजागृती अभियानांतर्गत पोलादपूर कापडे येथील श्री वरदायिनी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे स्लाईड शोच्या माध्यमातून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



रक्षाबंधन या सणानिमित्त रायगड शिक्षण प्रसारक मंडळ अध्यक्ष श्री हनुमंत जगताप यांच्या मार्गदर्शनपर संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरातील झाडांना संरक्षणात्मक राखी बांधून पर्यावरणीय राखी आणि रक्षाबंधन उत्सव साजरा केला. सिस्केप संस्थेचे अध्यक्ष प्रेमसागर मेस्त्री आणि कार्यवाह गणेश खातू यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना पर्यावरणातील नष्ट होत जाणाऱ्या अति धोक्यात आलेल्या वन्यजीव प्रजातींविषयी दृकश्राव्य माध्यमातून माहिती दिली. प्रिव्ही स्पेशालिस्ट आणि प्रीजीव स्पेशालिस्ट केमिकल्स कंपनी एमआयडीसी आणि सिस्केप संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने 'मगर जनजागृती अभियान अंतर्गत महाड परिसरात राबविण्यात येणाऱ्या मगर संवर्धन प्रकल्पाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

प्लास्टिक निर्मूलनासाठी शाळेमध्ये सागर मित्र अभियान आणि गांधारी सखी प्लास्टिक मुक्ती संकल्पना याची माहिती श्री गणेश खातो यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिली.

या वेळी रायगड शिक्षण प्रसारक मंडळ व्यवस्थापनाचे शाळा समिती सभापती रामदासी सकपाळ तसेच व्यवस्थापक सलागरे आदी उपस्थित होते.

उपस्थितांचे स्वागत शाळेच्या मुख्याध्यापिका स्मिता विजय पवार आणि उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या मोनिका सूद यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक रश्मी जंगम यांनी केले. या वेळी सर्व शिक्षक वृंद यांनी खुप चांगल्या पद्धतीत शिस्तबद्ध असे नियोजन केले. उपस्थितीत मान्यवरांसह सर्वांचे आभार पवार यांनी मानले.

# माणगाव तालुका पत्रकार संघातर्फे पुरस्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक कार्यात रायगड जिल्ह्यात नावलौकिक कमाविलेल्या माणगाव तालुका पत्रकार संघाचे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवर व्यक्तींना सन २०२५ या आठव्या वर्षातील पुरस्कार संघाचे अध्यक्ष सलीम शेख यांनी ५ ऑगस्ट रोजी माणगाव येथे झालेल्या पत्रकार संघाच्या बैठकीत जाहीर केले.

यावर्षीच्या सन २०२५ पुरस्काराचे मानकरी प्राप्ती राज ठाकूर (उरण), निलेश तुकाराम पवार (महाड), आरीफ आदम बामणे (हर्णे दाभोळ) तर माणगावमधील वैष्णवी पृथ्वीराज मानकर, श्रीकांत विनायक गणगणे, अपूर्वा अमोल जंगम, संतोष दत्तू मांजरे, भिकूशेठ तुकाराम धाडवे, सरिता शंकर दपके, मंगेश गोविंद मेथा, डॉ.चंद्रशेखर भाऊराव साकोलीकर, बशीर अहंमद हसन किरकिरे, इरफान अब्दुलरहिमान हाजीते, प्राची प्रमोद खेतम, अनिल परशुराम पवार, राजेश दत्तात्रय गंडाळे, निशिगंधा भारमल, दिपक रामभाऊ शेरकर, दिनेश बाळकृष्ण रातवडकर, सुरेखा मारुती तांबट, ज्योती खेमचंद मेथा, दिनेश नथुराम गुगळे तसेच सत्कारमूर्ती भास्कर सखाराम म्हस्के, भगवान महादेव पोवार, चंद्रकांत काशीराम धारिया, उशा प्रभाकर मेहता, प्रदिप अमृतलाल गांधी, पूनम रमन दोशी यांना जाहीर झाले आहेत.

या बैठकीला पत्रकार संघाचे ज्येष्ठ सल्लागार मजिदभाई हाजिते, उपाध्यक्ष प्रभाकर मसुरे, निलेश म्हात्रे, ज्येष्ठ सल्लागार आजेश नाडकर, संघाचे सचिव सचिन देसाई, सहसचिव स्वप्ना साळुंके, प्रवक्ता संतोष गायकवाड, सदस्य सिद्धी दाखिणकर, सुप्रिया शिंदे आदी पत्रकार उपस्थित होते.

# अंबा नदीला कोळी बांधवांकडून नारळ अर्पण; बेणसे-झोतिरपाडा येथे भव्य मिरवणूक



**पाली : प्रतिनिधी**

रायगडसह कोकणात नारळी पौर्णिमेच्या सणाला विशेष महत्त्व आहे. सालाबादप्रमाणे बेणसे झोतिरपाड्यात नारळी पौर्णिमेचा सण अत्यंत उत्साही पारंपरिक व धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. या वेळी नारळाची मिरवणूक काढून ढोल ताशा वाजवत व नाचत गाजत अंबा नदीवर येऊन विधीवत पुजेने नारळ अर्पण केले. येथील कोळी बांधव आपल्या उदरनिर्वाहासाठी पिढ्यानपिढ्या पूर्वापार नजीकच्या अंबानदीत मासेमारी करतात.

या नदीवर आपली उपजीविका असल्याने दरवर्षी सालाबादप्रमाणे श्रावण महिन्यातील नारळी पौर्णिमेला अंबानदीची पुजा करून नारळ अर्पण करतात.

या पारंपरिक व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनात प्रमुख भूमिकेत शिहू विभाग शिवसेना नेते तसेच ज्ञानगंगा कोळी समाज संस्थेचे रोहा तालुका उपाध्यक्ष, कामगार नेते अशोक विठोबा भोय, कोळी समाज नेते प्रमोद रघुनाथ तरे, माजी पोलीस अधिकारी पांडुरंग भोय, नथुराम भोय, विष्णु भोय, दत्ता तरे, मोहन भोय, संतोष कोळी, संजय भोय, विजय भोय, दिलीप भोय, रिंकू तरे, महेंद्र तरे, प्रवीण कोळी, कमलाकर कोळी, भास्कर कोळी, धीरज कोळी, प्रवीण भोय आदींचा सहभाग व मार्गदर्शन मोलाचे ठरले.



# माणगाव उतेखोल येथील शाळेतील ३१७ विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटप

## जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेतर्फे उपक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष तथा शिवसेने उपनेते निलेश सांबरे यांच्या माध्यमातून तसेच राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेतर्फे सोमवारी (दि.११) कुणबी भवन हॉल माणगाव येथे आदर्श प्राथमिक विद्यामंदिर उतेखोल - माणगाव शाळेतील ३१७ विद्यार्थ्यांना प्रत्येकी तीन वह्यांप्रमाणे ९५१ वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.



शिवसेनेचे युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, जिजाऊ संघटनेचे रायगड व ठाणे जिल्ह्यातील पदाधिकारी अमर राऊत, परेश कारंडे, गौरव खर्चे माणगाव येथील कार्यकर्ते निलेश म्हात्रे, नितीन शेलार, उमेश यादव, विजय बक्कम, विशाल पवार, मिलिंद शेलार, चैतन्य मेथा यांच्याहस्ते व उपस्थितीत करण्यात आले.

या वेळी मार्गदर्शन करताना शिवसेनेचे युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे म्हणाले की, जिजाऊ संघटनेचे संस्थापक अध्यक्ष निलेश सांबरे यांच्या माध्यमातून तसेच ना.भरतशेठ गोगावले यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षिण रायगड जिल्ह्यात शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटपाबरोबरच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असून हे कार्य अत्यंत स्तुत्य आहे. आज आपण आदर्श प्राथमिक विद्यामंदिर उतेखोल - माणगाव येथील विद्यार्थ्यांना वह्या वाटप करतोय हि एक नामांकित शाळा असून तालुक्यात हि शाळा जंगम गुरुजींची शाळा म्हणून प्रसिद्ध आहे. या शाळेतून चांगले विद्यार्थी घडून पुढे हे विद्यार्थी डॉक्टर, वकील, इंजिनिअर, मोठे उद्योगपती व्हावेत अशी इच्छा उभारे यांनी व्यक्त केली.

या वेळी बोलताना विपुल उभारे पुढे म्हणाले की, या संस्थेच्यावतीने व शिवसेनेतर्फे माणगावात मोफत सिबीएससी शाळा, मोफत सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करण्यात येणार आहे. तसेच दक्षिण रायगडातील सातही तालुक्यात मोफत रुग्णवाहिकेची सेवा उपलब्ध करून देणार आहोत. याचबरोबर येणाऱ्या काळात जिजाऊ आरोग्य क्लिनिक, शिक्षण सेवा,१३० खॉटचे अत्याधुनिक मोफत रुग्णालय, करिअर विकास सेवा,महिला सक्षमीकरण आदी महत्वपूर्ण गोष्टी करण्यात येणार असल्याची माहिती उभारे यांनी दिली. या कार्यक्रमास शाळेचे शिक्षकवर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.ए.आर. पाटील यांची प्राचार्यपदी नियुक्ती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वाशिवली येथे राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक डॉ.अनिल रामराव पाटील पाटील यांची प्राचार्यपदी नियुक्ती करण्यात आली.



डॉ. अनिल पाटील हे डॉ.पारनेरकर महाराज कनिष्ठ महाविद्यालयात गेल्या ३० वर्षापासून जीवशास्त्र विषयाचे अध्यापन करीत आहेत, या अध्यापनाच्या कालावधीत आपल्या विद्यार्थ्यांना त्यांनी योग्य शैक्षणिक मार्गदर्शन करून विविध क्षेत्रांमध्ये उत्तुंग भरारी घेण्यासाठी प्रवृत्त केले आहे. त्यांचे विद्यार्थी आज उच्च पदावर अधिकारी म्हणून तर काही डॉक्टरेट पदवी प्राप्त करून इंजीनियरिंग कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

यापूर्वीही त्यांची राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीवर जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणून रायगड जिल्ह्यात निवड झालेली होती. त्यांच्या या प्राचार्य पदी नियुक्ती झाल्याबद्दल जीवन कला मंडळ रसायनीचे कार्याध्यक्ष प्रज्ञावंत लक्ष्मीकांतजी पारनेरकर, अध्यक्ष तुलसीदास पाटील, सचिव अनंता दळवी, उपाध्यक्ष लक्ष्मीकांत सोनवणे, नंदकुमार जांभूळकर, सहसचिव अनंता दळवी, मोहन मालकर, शशिकांत कावरे, सदस्य व शिक्षक प्रतिनिधी प्रल्हाद माळी, शिक्षकेतर प्रतिनिधी अनिल पगारे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्राचार्य डॉ.पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

पूर्णवाद परिवार रसायनी व पनवेल, सरस्वती नवरात्र मंडळ रिस, सर्व सभासदांनी व परिसरातील आजी - माजी विद्यार्थ्यांनी डॉ. पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

# 'सुवर्णक्रांती'चा माणगाव येथे वर्धापन दिन साजरा

**माणगाव : प्रतिनिधी**

सहकार क्षेत्रातील सुवर्णक्रांती अर्बन मल्टिस्टेट निधी लिमिटेड शाखा माणगाव या शाखेचा द्वितीय वर्धापनदीन सोहळा शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वा.संस्थेचे संस्थापक एस. एम. म्हात्रे, संचालक शीतल पंडागळे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे.

या वर्धापन दीन सोहळ्यास संस्थेचे सर्व संचालक, सभासद, खातेदार, हितचिंतक, भागधारक, सर्व शाखांचे, शाखाधिकारी संभासद, कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या माणगाव, महाड, बिरवाडी शाखेतर्फे करण्यात आले आहे.

संस्थेच्या या वर्धापनदीन सोहळ्यात संस्थेचे सर्व शाखाधिकारी तसेच संस्थेच्या उन्नतीसाठी योगदान देणाऱ्या सर्व मान्यवरांचे या वेळी संस्थतर्फे यथोचित सत्कार करण्यात येणार आहे. वर्धापनदीन सोहळा उत्साहात साजरा करण्यासाठी संस्थेचे माणगाव शाखाधिकारी राकेश पडवळ, मोर्बा संदीप सकपाळ, महाड सुशांत जाधव, सवाद - पोलादपूर इंदिरा हनुमंत लावन, बिरवाडी संगीता श्रीहरी जाधव, उरण राम म्हात्रे, पनवेल वकील इउच् सविता गायकवाड, अंबरनाथ राजेश काठवले, नेरळ संदीप वाकळे, नाशिक शांताराम गडकरी, कामोठे सुनील हिलाल, डोंबिवली शाखा अधिकारी अन्वी कदम, नेरळ सोनम भोईर, उरण रोशनी कोळी, पनवेल वकील सचिन भोसले, कामोठे सुदाम कानवडे, अंबरनाथ कुलदीप पवार, माणगाव लतिका पोटले, विधी सावंत, अक्षता मोरे, किशोर झेमसे, ज्योती गोरे, अंकिता हर्णे, महाड - बिरवाडी दिव्या झांजे, महाड - पोलादपूर मंगेश साळुंखे व सहकारी विशेष परिश्रम घेत आहेत.

# आशिया चषकासाठी तंदुरुस्तीला प्राधान्य

## सूर्यासह अय्यर, पांड्याला द्यावी लागणार फिटनेस टेस्ट



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

युएईच्या मैदानात रंगणाऱ्या आशिया कप टी-२० स्पर्धेसाठी ऑगस्टच्या अखेरपर्यंत भारतीय संघाची निवड अपेक्षित आहे. या स्पर्धेसह कसोटी संघात कमबॅकसाठी श्रेयस अय्यर फिट आहे, परंतु त्याच्यासह सर्जरी झालेला सूर्यकुमार यादव आणि बऱ्याच काळापासून मैदानाबाहेर असणारा हार्दिक पांडा यांनाही फिटनेस चाचणी करावी लागणार आहे.

भारतीय टी-२० संघाचे नेतृत्व करणारा सूर्यकुमार यादव याच्यावर स्पोर्ट्स हार्नियाची सर्जरी झाली असून तो सध्या बंगळुरूस्थित राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत (एसनसीए) पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण करत आहे. दुसरीकडे हार्दिक पांड्यालाही फिटनेस टेस्ट द्यावी लागणार आहे. आयपीएल स्पर्धा झाल्यापासून तो क्रिकेटपासून दूर आहे. ११ आणि १२ ऑगस्टला तो एसनसीएत फिटनेस टेस्ट देणार असल्याचे वृत्त समोर येत आहे.

हार्दिक पांड्या हा भारतीय संघातील महत्त्वपूर्ण खेळाडू आहे. २०२४च्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेसह २०२५मध्ये झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत त्याने संघाच्या विजयात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. पांड्याने आगामी आशिया कप स्पर्धेसाठी जुलैपासून मुंबईत सरावाला सुरुवात केली आहे, पण बऱ्याच दिवसांपासून क्रिकेटपासून दूर असल्यामुळे बीसीसीआयच्या नियमानुसार त्याला फिटनेस टेस्ट द्यावी लागणार आहे. ही टेस्ट पार करून तो आशिया कप संघात सहभागी होईल, अशी अपेक्षा आहे.

भारतीय संघातील मध्यफळीतील फलंदाज श्रेयस अय्यर हा जवळपास दोन वर्षांपासून टीम इंडियातून बाहेर आहे. २०२३मध्ये त्याने अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. २७ ते २९ जुलैदरम्यान घेण्यात आलेल्या फिटनेस टेस्टमध्ये तो पास झाला असून टी-२० संघासह कसोटी संघातही तो कमबॅक करण्यास सज्ज झाला आहे.

भारतीय टी-२० संघाचा कर्णधार स्पोर्ट्स हार्नियाच्या शस्त्रक्रियेतून सावरून मैदानात उतरण्यासाठी प्रयत्नशील आहे. याचवर्षी जूनमध्ये जर्मनीतील म्युनिख येथे त्याच्यावर शस्त्रक्रिया झाली होती. फिटनेससाठी त्याला आणखी एक आठवडाभर एनसीएत थांबावे लागणार आहे. काही दिवसांपूर्वी त्याने फलंदाजी करतानाचा व्हिडिओ शेअर केला होता. तो वेगाने रिकव्हर होत असून फिटनेस टेस्ट क्लियर केली तर तोच आशिया कप स्पर्धेत भारतीय टी-२० संघाचे नेतृत्व करताना दिसू शकतो.

# सान्वी शिंदे-आदित्य दिघे ठरले 'गोल्ड पेअर'




## राष्ट्रीय एक्रोबॅटिक टम्बलिंग अॅण्ड ट्रॅम्पोलीन स्पर्धेत सुवर्ण यश

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथील सान्वी शिंदे व आदित्य दिघे यांनी राष्ट्रीय एक्रोबॅटिक टम्बलिंग ॲण्ड ट्रॅम्पोलीन स्पर्धेत सुवर्ण यश प्राप्त केले. या दोघांनी मिक्स पेअर ज्युनियर गटात सर्व इवेंट्समध्ये सुवर्णपदके पटकावून 'गोल्डन पेअर' ठरले.

उत्तराखंडमधील रायपूर येथील महाराणा प्रताप स्पोर्ट्स स्टेडियमवर झालेल्या या राष्ट्रीय स्पर्धेत श्री नारायण आचार्य विद्यानिकेतन चेंबूरच्या अक्रोबॅटिक जिमनॅस्टिक्सच्या खेळाडूंनी सहभाग घेतला होता. एकूण २२ इवेंटमध्ये सहभागी होत खेळाडूंनी १० सुवर्ण आणि सात रौप्यपदकांसह घवघवीत यश संपादन केले. यात नेरूळमधील सान्वी शिंदे व आदित्य दिघे यांचा समावेश होता. त्यांनी मिक्स पेअर ज्युनियर गटात सर्व इवेंट्समध्ये सुवर्ण पदके पटकावून हे दोघे 'गोल्डन पेअर' ठरले.

याचसोबत श्री नारायण आचार्य विद्यानिकेतनच्या एकूण २२ खेळाडूंपैकी १७ खेळाडूंनी एशियन चॅम्पियनशिप स्पर्धेत आपले स्थान सुनिश्चित केले. खेळाडूंच्या या यशाने त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# रोहित शर्माने खरेदी केली लॅम्बोर्गिनी

## हिटमॅनच्या ताफ्यात नवी कार

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा याने नवीकोरी लॅम्बोर्गिनी कार खरेदी केली आहे. केशरी रंगाची ही सुपरकार दिसायला अतिशय आकर्षक आहे, पण चाहत्यांच्या नजरा या कारच्या नंबर प्लेटवर खिळल्या आहेत. रोहित शर्माच्या कारचा नंबर ३०१५ आहे. हा सामान्य नंबर नसून त्या नंबरचे एक खास कारण आहे.

रोहित शर्माकडे यापूर्वी निळ्या रंगाची लॅम्बोर्गिनी कार होती. ती कार लोकप्रिय होण्याचे कारण म्हणजे, त्या कारचा नंबर ०२६४ होता. रोहित शर्माच्या नावे एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक २६४ धावांचा विक्रम आहे. श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात त्याने ही ऐतिहासिक कामगिरी केली होती. या धावसंख्येवरूनच रोहितने आपल्या कारचा नंबर ठेवला होता, मात्र काही महिन्यांपूर्वीच रोहितने त्याची ही कार एका फॅन्टसी ॲप विजेत्याला भेट म्हणून दिली.

रोहितने केशरी रंगाची लॅम्बोर्गिनी उरुस कार खरेदी केली आहे. या कारच्या किमतीबद्दल बोलायचे झाले तर, भारतातील एक्स-शोरूम किंमत ४.५७ कोटी रुपये आहे. यापूर्वीच रोहितने अनेक आलिशान गाड्या खरेदी केकेल्या आहेत.






# तळा तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा



**तळा : प्रतिनिधी**


तळा तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा ११ ते २५ ऑगस्ट या कालावधीत आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेचे उद्घाटन नायब तहसीलदार जितेंद्र टेंबे यांच्या हस्ते ज्ञानदीप विद्यामंदिर बोरघर हवेली येथे झाले.

उद्घाटन समारंभास बोरघर संस्थेचे अध्यक्ष नाना दळवी, उपाध्यक्ष पांडुरंग माळी, शाळा समितीचे चेअरमन यशवंत मोंढे, प्रशांत माळी, केंद्रप्रमुख तथा विस्तार अधिकारी मुबीन वासकर, गौतम मनवर, क्रीडा समन्वयक प्रा. पी.पी. कसबे, विनोद लाड यांच्यासह मुख्याध्यापक, पंच, क्रीडा शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

क्रीडाज्योत प्रज्वलन केल्यानंतर समृद्धी मंडलिक या विद्यार्थिनीने खेळाडूंना क्रीडा शपथ दिली. स्पर्धेत तळा, बोरघर, पिटसई, पढवण, मजगाव, महागाव, म्हसाडी, मांदाड, उसर येथील शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले आहेत. ११ ऑगस्ट रोजी मुलींच्या खो-खो व कबड्डी स्पर्धा रंगली. १२ ऑगस्टला मुलांचे कबड्डी व खो-खो, १३ रोजी मैदानी स्पर्धा, १८ तारखेला बॅडमिंटन व कुस्ती स्पर्धा, १९ रोजी बुद्धिबळ व कराटे, तर २५ ऑगस्टला कॅरम, व्हॉलीबॉल आदी खेळांच्या स्पर्धा होणार आहेत.












## महिला वनडे वर्ल्डकप ट्रॉफीचे अनावरण

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय महिला संघ यंदाच्या वनडे वर्ल्डकप स्पर्धेत इतिहास रचण्यासाठी सज्ज आहे. भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हिने आयसीसीचे अध्यक्ष जय शाह आणि भारताचा वर्ल्ड चॅम्पियन युवराज सिंगच्या उपस्थितीत मुंबईत झालेल्या वनडे वर्ल्ड कप ट्रॉफीच्या अनावरण सोहळ्यात या संदर्भात भाष्य केले आहे.

हरमनप्रीत कौर म्हणाली की, आम्ही ते मिथक मोडून काढत नवा इतिहास रचून भारतीयांना अपेक्षित कामगिरी करून दाखवण्यासाठीच मैदानात उतरू. वर्ल्डकप नेहमीच खास असतो. मी नेहमीच देशासाठी खास कामगिरी करण्यासाठी प्रयत्नशील असते. ज्या वेळी मी युवी भाईला पाहते त्या वेळी प्रेरणा मिळते, असे म्हणत तिने युवीच्या साक्षीने वर्ल्डकप जिंकण्याचा मानस व्यक्त केला. या वेळी भारतीय संघाची उपकर्णधार स्मृती मानधना आणि माजी कर्णधार मिताली राजदेखील उपस्थित होती.





लोकनेते मा. खासदार श्री रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्त

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आयोजित

रायगड जिल्हास्तरीय

भजन स्पर्धा




भजन परंपरेला प्रोत्साहन देण्यासाठी भजन स्पर्धेचे आयोजन!
रायगडमधील सर्व भजनी मंडळांनी या उपक्रमात सहभागी व्हावे!

शनिवार दिनांक २३ ऑगस्ट २०२५ आणि रविवार दिनांक २४ ऑगस्ट २०२५.
वेळ - सकाळी ९.०० ते सायं. ७.००
स्थळ - श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ हॉल, प्लॉट नं. ४७५, मार्केट यार्ड,पनवेल.

प्रवेश अर्ज

१) भजन मंडळाचे नाव ____________
२) भजन स्पर्धक मंडळाचा पत्ता ____________
३) संपर्क क्रमांक ____________
४) गायकाचे नाव ____________
५) मृदंग वादकाचे नाव ____________
६) तबला वादकाचे नाव ____________

प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख १५ ऑगस्ट २०२५.

पुरुष खुलागट - महिला खुलागट

| प्रथम पारितोषिक | द्वितीय पारितोषिक | तृतीय पारितोषिक | उत्तेजनार्थ पारितोषिक |
|---|---|---|---|
| ५१,०००/- सन्मानचिन्ह | २५,०००/- सन्मानचिन्ह | १५,०००/- सन्मानचिन्ह | ७,०००/- सन्मानचिन्ह |
| | उत्कृष्ट पखवाज वादक ७,०००/- सन्मानचिन्ह | उत्कृष्ट तबलावादक ७,०००/- सन्मानचिन्ह | |

स्पर्धा संपन्न झाल्यानंतर लगेचच स्पर्धेचा निकाल जाहीर करून बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क

सागर राजे - ९२२४३४४१३६, नारायण बुवा पाटील - ७७१५८३५४२४, उमेश बुवा चौधरी - ९३२४८२४२०५, चंद्रकांत मने - ९७६८६५६४८४, विनोद तोडेकर - ७०४५८२२५४८, जगदीश म्हात्रे ९३२६८१२१९६, पुनमताई ठाकूर - ७२०८७७६००५, पवन राजे - ९२२१०९७३३७, अभिषेक पटवर्धन - ९०२९५८०३४३, अनिल कोळी - ९१६७४७४५०७, मच्छिंद्र पाटील - ९००४०४८६३, डॉ. शैलेश वाजेकर - ९८६७२९६८५०

स्पर्धेची नियमावली

१) भजन स्पर्धा प्राथमिक फेरी आणि अंतिम फेरी अशा दोन टप्पात होईल.
२) प्राथमिक फेरी हि ऑनलाईन स्वरूपात घेण्यात येईल.
३) प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या सर्वोत्तम पुरुष १५ व महिला १५ स्पर्धक भजन मंडळींना अंतिम फेरीसाठी आमंत्रित करण्यात येईल.
४) प्राथमिक फेरीत भाग घेण्यासाठी २ ते ३ मिनिटांचा साउंड सिस्टिम न वापरता शुटींग केलेला नॉन एडिटेड व्हिडीओ 9167474507 या नंबरवर व्हॉट्सअप करावा. सदर व्हिडिओ आणि मंडळाची माहिती (मंडळाचे नाव, सहभागी कलाकारांची नावे इत्यादी, भजन स्पर्धेच्या किमान सात दिवस अगोदर पाठवावी).
५) अंतिम फेरीत निवड झाल्यावर प्रत्यक्ष सादरीकरण करताना मुख्य गायक-वादकांसह कमीत कमी ६ जणांचा आणि जास्तीत जास्त १२ जणांचा समावेश असावा.
६) अंतिम फेरीत भजन सादरीकरणासाठी फक्त २० मिनिटांचा निर्धारित वेळ असणार आहे.
७) श्लोक, भजन, एक अभंग आणि एक गौळण सादर करणे आवश्यक आहे.
८) सादरीकरणासाठी घेतलेले अभंग आणि गौळण हे संताचेच असावेत. (रचलेले अभंग, स्वरचित काव्य, गौळण, भक्तिगीत चालणार नाहीत) अभंग सादरीकरण करताना फिल्मी चालीत अभंग गाऊ नये,
९) निवड झालेल्या मंडळींनी निर्धारित वेळेच्या एक तास अगोदरच उपस्थित राहणे आवश्यक आहे.
१०) व्यासपीठावर बसण्याच्या अगोदरच आपापली वाद्ये सुरात मिळवून ठेवावीत. फक्त आवाज तपासून घेण्यासाठी ५ मिनिटांचा वेळ देण्यात येईल.
११) स्पर्धेसाठी लागणारे साहित्य आणि वाद्ये आपण स्वतःची आणावी.
१२) तबला, पेटी, टाळ, पखवाज हे चार आणि कोरस तीन असे एकूण ७ जण असावेत.
१३) प्राप्त परिस्थितीनुसार कार्यक्रमात फेरबदल करण्याचा आयोजकांना अधिकार राहिल.
१४) परिक्षकांचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक राहिल. परिक्षकांबरोबर कोणत्याही कारणाने वाद घालता येणार नाही.
१५) आवश्यक असल्यास इतर काही नियम कार्यक्रम स्थळी समजविण्यात येतील.
१६) प्राथमिक फेरीत भाग घेतल्यानंतर फोन करुन विचारणा करु नये. अंतिम यादी प्रसारीत करण्यात येईल.
१७) स्पर्धेतील गायक, वादक, चकवा वादक किंवा कोणतेही कोरस दुसऱ्या मंडळात सहभागी होवू शकणार नाही.
१८) पारंपारिक भजनातील साहित्याचा वापर करता येईल. (इलेक्ट्रॉनिक तानपु-याचा वापर करावयास हरकत नाही.)
१९) भजन सादरीकरण करताना पारंपारिक पोषाख असावा.

सुचनाः भजन स्पर्धेत सहभागी झालेल्या मंडळाचे सादरीकरण कसे झाले याबद्दल परिक्षक LIVE समिक्षा करतील. तसेच सहभागी झालेल्या कलाकारांना योग्य त्या प्रतिक्रिया आणि आवश्यक असल्यास सुचना करतील, जेणेकरुन त्यांना प्रोत्साहन मिळेल, शिवाय निकाल देताना पारदर्शकता जपता येईल.


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com